
BMM बृहन्महाराष्ट्र मंडळ
2.0
BMM मराठी शाळा
पुरवणी पुस्तिका
इयत्ता पहिली ते पाचवी
अ
१
ड
ब
क
४
२
३
विश्वभारती
मराठी बोला वाचा लिहा

# बृहन्महाराष्ट्र मंडळातील मराठी मातृभाषा असलेल्या विद्यार्थ्यांसाठी सचित्र कार्यपुस्तिका

पुरवणी पुस्तिका इयत्ता पहिली ते पाचवी

**मराठी भाषा पुरवणी पुस्तिका दुसरी आवृत्ती - २०२३**

पहिली आवृत्ती - २०१४

**बृहन्महाराष्ट्र मंडळ २.० कार्यपुस्तिका समिती**

**उत्तर अमेरिका**

**संपर्क: shala@bmmonline.org**

Teacher's guidelines: Minimum a two year gap between two consecutive level exams, and/or 120/80 instruction hours are recommended for each student enrolled under BMM Shala project through its local shala. This helps to prepare the students better and, overall studentship may retain better. Normally a teacher needs 120//80 hours minimum (60/40 hours per academic year) to teach the entire syllabus (based on eBook of the particular level). Rarely do students grasp the syllabus in a shorter time.

Generally, when a child starts the classes at age 4/5 then, following may apply Age 7-8 eligible for level 1. Age 9-10 eligible for level 2. Age 11-12 eligible for level 3. Age 13-14 eligible for level 4. Age 15-16 eligible for level 5. The recommended age for each grade level is given approximately. The age criteria varies depending on the student's progress. Older students may progress faster for primary levels.

# पुरवणी पुस्तिकेविषयी मनोगत

बृहन्महाराष्ट्र मंडळाच्यावतीने, महाराष्ट्राच्या बाहेर राहणाऱ्या विद्यार्थ्यांना मराठी शिकवण्यासाठी उपयोगी होईल, अशी ही विश्वभारती पुरवणी पुस्तिका. नवीन शिक्षकांना ह्या पुरवणी पुस्तिकेतून नक्कीच मार्गदर्शन मिळेल.

प्रस्तुत पुस्तिकेमध्ये श्लोक, प्रार्थना, कविता, गोष्टी, उतारे, शब्द ओळख, माहिती, सामान्य ज्ञान आणि सांस्कृतिक गोष्टीं याचा समावेश आहे. ह्या पुरवणी पुस्तिकेचे वैशिष्ठ्य म्हणजे, स्तरानुसार अभ्यासक्रम, व्याकरणाची सर्व साधने, शिक्षकांसाठी उपयुक्त माहिती, Lesson Planning, इत्यादी अनेक विषयांचा समावेश केला आहे.

उत्तर अमेरिकेतील अनेक गावांमध्ये गेली कित्येक वर्षे मराठी शाळा चालू आहेतच. परंतु २००७ मध्ये फिलाडेल्फिया येथे भरलेल्या बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या परिषदेत या सर्व शाळांना एका छत्राखाली आणण्याच्या विचाराला चालना मिळाली. सर्व शाळांसाठी एकसंध अभ्यासक्रम तयार करण्याच्या कामाची मुहूर्तमेढ रोवली गेली. प्रस्तुत पुरवणी पुस्तिका त्याच मार्गदर्शिकेवर आधारित आहे.

नॉर्थ अमेरिकेतील काही शाळांकडून आम्ही काही लेख, गोष्टी, गाणी, घेतली आहेत. त्यांचे आम्ही खूप आभारी आहोत.

आम्हाला विश्वभारती मालिकेची दुसरी आवृत्ती सादर करताना मनापासून आनंद होत आहे. विश्वभारती मालिकेची पहिली आवृत्ती सादर करणाऱ्या समितीचे मनापासून धन्यवाद!

ह्या संपूर्ण प्रक्रियेत आमच्या बृहन्महाराष्ट्र मराठी शाळा समितीने, अध्यक्ष संदीप दीक्षित आणि शाळा विभागाचे नेतृत्व करणाऱ्या सविता मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली भरपूर मेहनत घेतली. समितीतील कार्यकर्त्या सविता मोरे, श्रुती पांडे, मयूरी नाईक, मीनल जोशी, अंजली भिडे, अश्विनी देवधर, ह्यांनी आपले योगदान केले

आहे. पुस्तकाचे मुखपृष्ठ शितल रांगणेकर यांनी बनवले आहे, पुस्तिकेचे मुद्रितशोधन अंजली भिडे आणि सविता मोरे यांनी केले आहे. त्यांचे मनापासून आभार.

या कामात सुधारणा करण्यासाठी सर्व शिक्षक, पालक आणि मराठी प्रेमींची आम्हाला मदत हवी आहे. आपल्या सूचना आम्हाला अवश्य कळवा. आम्ही त्यांचा पुढील आवृत्यांमध्ये निश्चित उपयोग करू.

बृहन्महाराष्ट्र मंडळ, उत्तर अमेरिका

BMM shala e-book team.

**Lesson Planning**

It is advisable for teachers to do tentative Lesson Planning in advance; for the entire academic year, to ensure efficient completion of the syllabus in allocated class time during the calendar year.
While using the workbook series, as per your student level and proficiency in Marathi language, you can divide the workbook in sections. The first half can be taught during the first year, and the next half to be used during the following year. We recommend that lesson planning can be done every quarter. The tentative plan for the schedule of the day can be as follows:

| 1 Day of the week. | Schedule |
|---|---|
| Students must be attentive in each class. They must be respectful with friends and teachers. They can eat after or before class. They must follow teachers instructions and can't say NO to teachers.<br><br>Topics to be taught and worksheets to be written by children must be planned 2 to 3 weeks ahead of each class date. BMM workbook page numbers to be taught must be marked.<br>Teachers must be 100% available, eager and ready to teach, presentable, cheerful and gentle during class. | 1. Roll call<br>2. Prarthana<br>3. Shlok<br>4. Suvichar<br>5.Icebreaker/ encourage each student to share their thoughts in Marathi language on topics of their choice or teachers' choice.<br>6. A lesson from syllabus<br>7. Comprehension<br>8.Song or a poem from the syllabus.<br>9. Likhan/ writing practice.<br>10.Review.<br>11.In class homework lasts 10 to 15 minutes.<br>12.End of the class salutation. |

# अनुक्रमणिका

# Table of Contents

पुरवणी पुस्तिकेविषयी मनोगत....................................................................3
Table of Contents.............................................................................................6
Shala team Conduct And Responsibilities.............................................9
Students & Families, Responsibilities................................................ 11
स्तर पहिला (Level 1 Pahili)..................................................................... 16
स्तर दुसरा (Level 2 Dusari)..................................................................... 40
स्तर तिसरा (Level 3 तिसरी)........................................................................70
स्तर चौथा (Level 4 Chauthi).......................................................................93
स्तर पाचवा (Level 5 Pachawi)...............................................................108
परिशिष्टे ............................................................................................... 127
शिष्टाचार आणि स्वागत ........................................................................ 128
मराठी सुविचार............................................................................................. 129
अभ्यासाव्यतिरिक्त उपयुक्त संकल्पना...........................................................137
सकस आहार................................................................................................ 138
Study guide & SYLLABUS (Grade 1 through 5.)........................... 142

## Shala team Conduct And Responsibilities

**Shala team (Principal, Administrator, Treasurer, IT volunteers, Teachers),** Evaluate students in class, and communicate to parents if the child is eligible to class level. Minimum two year gap between two consecutive level exams, and/or 120/80 instruction hours are recommended. This helps to prepare the students better, and overall studentship retains. Normally a teacher needs 120/80 hours minimum (60/40 hours per academic year): to teach the entire syllabus (based on eBook of the particular level). Rarely do students grasp the syllabus in a shorter time. Age criteria is approximate. This varies on each student's progress, older aged students progress fast for primary levels.

Shala team must follow the shala code of conduct. All must be kind, gentle and clear in her/his teaching sessions. Eating, drinking, talking in loud voices, laughing, etc must be restricted during class.

1. Use the time during class hours for teaching the prescribed curriculum and goals, as stated for the academic level the teacher is assigned to teach.
2. Use of correct subject matter appropriate for individual needs of the students. Represent the teacher's training/ qualifications in a true and accurate manner.

3. Maintain a positive atmosphere and interactions in the classroom at all times , while teaching, giving feedback to students and correcting mistakes.
4. Please make the teaching commitment for the entire academic year in order to maintain consistency and regularity of your attendance in the classroom as per the academic calendar provided by your school Coordinator
5. In case of possible absentees due to vacations or personal reasons, please notify the school coordinator in a timely manner, to make arrangements for substitute teachers in your classroom.
6. If extra assistance is needed in the class-room, please notify and consult the school coordinator of your school, in a timely manner, so a trained assistant teacher can be arranged in your classroom.
7. Perform all of the assigned duties and responsibilities such as teaching, homework assignments, administering exams, submitting results in the stipulated time.
8. Please avoid usage of classroom time to make personal phone calls , or work etc. if snack break is needed please provide 5 mins for snack break

(*Please note : If your school does not follow the model of one assigned teacher for the entire academic year due to lack of volunteer support, small student size etc , feel free to follow your school's structure and guidelines)*

## Students & Families, Responsibilities

Students must have 80% to 90% class attendance. Encourage students to be attentive, to follow the teacher's instructions, and to ask follow up questions. Students should be cooperative with teachers. Students are expected to attend in person shala sessions regularly and also the in person shala events. Student family participation is very crucial to the overall success of the student. Volunteering in shala activities and being respectful to shala teachers is expected from the families. Parents should strictly follow the drop off and dismissal times of the shala.

Quiz (Shala Team)

Shala Team, please contemplate the answers to the following questions. Feel free to research/discuss these topics with your fellow teachers. These thought-provoking questions might be helpful in your individual lesson planning throughout the year.

- तुमच्या मते तुमच्या वर्गात येणाऱ्या मुलांना तुम्हाला कसे शिकवायला आवडेल? clue : व्यक्तिगत or एकत्रित
- पहिल्या वर्गात शिकवितांना शिक्षकाला अभ्यासाची किंवा तयारीची गरज असते का? उत्तरामागच्या कारणांचा विचार करा.
- मुलांना मराठीची गोडी लागावी म्हणून तुम्हाला वेगळे प्रयत्न करायला आवडेल का?
- पालकांना आपल्या मराठी शिकविण्याच्या कामात अंतर्भूत करून घ्यायला आवडेल का ?
- मुलांना मराठी शिकवितांना तुम्हाला आलेल्या समस्या आणि त्यावर तोडगा काढतांना दुसऱ्या शाळेतील शिक्षकांची मदत घ्यायला आवडेल का ?
- शिक्षकांना प्रशिक्षणाची गरज आहे असे तुम्हाला वाटते का?
- शाळेत पालक - शिक्षक बैठक किती वेळा व्हावी असे तुम्हाला वाटते ?

  clue: त्रैमासिक/ सहामाही/ वार्षिक

- शाळा पुन्हा पूर्वव्रत in person व्हावी असे तुम्हाला वाटते का?
- मुलांना त्यांच्या रोजच्या शाळेच्या अभ्यासा व्यतिरिक्त, एक तास आपल्या मराठी शाळेचा अभ्यास द्यावा का? अधिक अभ्यासाची गरज आहे का? अधिक सराव शाळेत करून घ्यावा का?

© BMM Marathi Shala eBook Team

- मराठी शिकवतांना काही इतर साहित्य आवश्यक आहे का?( flash cards, charts).
- विद्यार्थी त्यांच्या नियुक्त अभ्यासक्रम स्तरात मागे पडत असतील अथवा त्यांची प्रगती वेगाने होत असेल तर त्याची काळजी कशी घ्यावी असे तुम्हाला वाटते?

**मराठी शाळेची महत्वाची उद्दिष्टे:** शाळा शिक्षकांनी अभ्यासक्रम शिकवताना, शिकविण्यासाठी वर्षभराचे नियोजन करताना, आणि वर्गात विद्यार्थ्यांना सूचना देताना खालील उद्दिष्टे साध्य होतील, ह्याची कृपया काळजी घ्यावी.

१) मराठी भाषेच्या अभ्यासातून विद्यार्थ्यांचा शैक्षणिक स्तर, वय, क्षमता, इत्यादीनुसार; श्रवण, संभाषण, वाचन, लेखन, ही चारही मूलभूत कौशल्ये निर्माण करणे .

२) मराठी भाषेचा बोली भाषा म्हणून वापर करण्याचा आत्मविश्वास विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करणे.

३) विद्यार्थ्यांना आपले स्वतःचे अनुभव, विचार, कल्पना, आणि भावना; लेखी आणि तोंडी माध्यमातून व्यक्त करता येण्याचे कौशल्य निर्माण करणे. त्यांची क्षमता वाढविण्याचा प्रयत्न करणे.

४) मराठी संस्कृतीची ओळख करून देणे, आणि त्याबद्दल आवड निर्माण करणे .

५) विद्यार्थ्यांच्या विचारशक्तीला आणि कल्पनाशक्तीला चालना देणे.

© BMM Marathi Shala eBook Team

NATIONAL ANTHEM

**THE UNITED STATES OF AMERICA**

"The Star Spangled Banner"

Francis Scott Key (1814)

Oh,say, can you see, by the dawn's early light,
What so proudly we hailed at the twilight's last gleaming?
Whose broad stripes and bright stars, thro' the perilous fight,
O'er the ramparts we watched, were so gallantly stunning?
And the rocket's red glare, the bombs bursting in air,
Gave proof through the night that our flag was still there,
Oh, say does that star-spangled banner yet wave,
O'er the land of the free and the home of the brave?



USA Flag

© BMM Marathi Shala eBook Team

## NATIONAL ANTHEM OF INDIA

## राष्ट्रगीत

जन - गण - मन अधिनायक जय हे

भारत-भाग्य- विधाता

पंजाब सिंध गुजरात मराठा

द्राविड़ उत्कल बंग

विंध्य हिमाचल यमुना गंगा

उच्छल जलधि तरंग

तव शुभ नामे जागे

तव शुभ आशिष माँगे

गाहे तव जय गाथा

जन - गण मंगलदायक जय हे

भारत-भाग्य- विधाता

जय हे, जय हे, जय हे ,

जय जय जय जय हे



भारताचा झेंडा

© BMM Marathi Shala eBook Team

# स्तर पहिला (Level 1 Pahili)

- श्लोक Shlok
- कविता Poems
- गोष्टी आणि उतारे Stories and Comprehension Paragraphs
- शब्दशोध Word search



© BMM Marathi Shala eBook Team

## श्लोक

रामा तुझे कोमल नाम घेतां ।
संतोष वाटे बहू फार चित्ता ।
बापा दयाळा मज भेट द्यावी।
दारिद्रय चिंता अवघि हरावी ।।



मोरया मोरया मी बाळ तान्हे।
तुझीच सेवा करू काय जाणे।
अन्याय माझे कोट्यानकोटी।
मोरेश्वरा बा तु घाल पोटी।।



गणाधीश जो ईश सर्वां गुणांचा।
मुळारंभ आरंभ तो निर्गुणाचा॥
नमूं शारदा मूळ चत्वार वाचा।
गमूपंथ आनंत या राघवाचा॥१॥



© BMM Marathi Shala eBook Team

मना सज्जना भक्तिपंथेचि जावें।
तरी श्रीहरी पाविजेतो स्वभावें॥
जनीं निंद्य तें सर्व सोडूनि द्यावें।
जनीं वंद्य ते सर्व भावे करावे॥२॥

ज्या ज्या ठिकाणी मन जाय माझे ।
त्या त्या ठिकाणी निज रूप तुझे ।
मी ठेवितो मस्तक त्या ठिकाणी ।
तेथे तुझे सदगुरू पाय दोन्ही ॥३॥

© BMM Marathi Shala eBook Team

कविता Poems

## पोलिसदादा पोलिसदादा

एक दोन एक दोन
पोलिसदादा होणार कोण?



तीन चार तीन चार
रस्त्यावर गर्दी फार

पाच सहा पाच सहा
मागे पुढे नीट पहा

सात आठ सात आठ
चालताना मान ताठ

नऊ दहा नऊ दहा
पोलिसदादाची ऐट पहा

© BMM Marathi Shala eBook Team

## बाळाचे जेवण



भात खाल्ला गुटु  गुटु
पोळी खाल्ली चुटू चुटू

खीर प्यायला भर भर
भाजी गिळली  झर  झर

आमटी प्यायला फुर्र  फुर्र
पापड खाल्ला कुर्र कुर्र



चटणी  खाल्ली एक बोट
बाळाचं भरलं पोट पोट

ढेकर आली ढुरूक ढुरूक
बाळ हसलं खुदु खुदु

© BMM Marathi Shala eBook Team

## आठवडा म्हणजे आठ वार

पहिल्या वाराचे नाव  सोमवार

आठवड्याची सुरवात करू छान फार

सोमवार मंगळवार दोन भाऊ
डब्यात आई देते आवडीचा खाऊ

बुधवार नेहमी येतो तिसरा
हट्ट आणि मस्ती कायम विसरा

गुरुवार आला की  वाट पाहूया
मैदानावर खेळायला जाऊया

शुक्रवार माझा आवडीचा
स्लीप-ओव्हर चा बेत करायचा

शनिवारशी माझी खूप गट्टी
गृहपाठ नंतर खेळाशी दोस्ती

रविवारी असते शाळेला सुट्टी
कधीतरी छान वाटते अभ्यासाला बुट्टी

| | |
|---|---|
| Monday | सोमवार |
| Tuesday | मंगळवार |
| Wednesday | बुधवार |
| Thursday | गुरुवार |
| Friday | शुक्रवार |
| Saturday | शनिवार |
| Sunday | रविवार |



-अंजली भिडे

© BMM Marathi Shala eBook Team

## अभिनय गीत



टुणू -टुणू  टुणू -टुणू  बेडूक ताई
डराव डराव डराव बोलत राही
आपण उड्या  मारूया बेडूकराव होऊया  ॥१॥



लुसलुशीत गुबगुबीत ससेभाऊ
हिरवा पाला हाती घेऊ
तुरू- तुरू तुरू-तुरू धावू या, ससेभाऊ होऊया ॥२॥



हळूहळू हळूहळू हत्ती डोले
लांब लचक सोंड ती मजेत हाले
डोलत डोलत डोलत चालूया, हत्तीदादा होऊया ॥३॥



तबडक तबडक आवाज होई
घोडे दादा धावत जाई
जोरात जोरात  धावू या घोडेदादा होऊया  ॥४॥



सुळू सुळू  सुळू सुळू मासोळी होऊ
दिवस रात्र पाण्यामध्ये तरंगत राहू
तिच्यासंगे पोहू या मासोळी ताई होऊ या ॥५॥

© BMM Marathi Shala eBook Team



पळा रे पळा
गोलावर सर्वजण पळा रे पळा ॥ १ ॥

उडा रे उडा
वाऱ्यावर सर्व जण उडा रे उडा ॥ २ ॥

नाचा रे नाचा
थय थय थय थय नाचा रे नाचा ॥ ३ ॥



हसा रे हसा
हा हा ही ही हसा रे हसा ॥४॥

बसा रे बसा
गोलावर सारेजण बसा रे बसा ॥५ ॥

झोपा रे झोपा
डोळे मिटून शांत जरा झोपा रे झोपा ॥ ६॥

© BMM Marathi Shala eBook Team



चिमणीची चिव चिव
टिटवीची टिव टिव
ऐकलीस का ? ऐकलीस का?



कावळ्याचं काव काव
मांजराचं म्याव म्याव
ऐकलस का ? ऐकलंस  का?



कोंबड्याचं कु कूच कु
पुंगीच पू  पू
ऐकलस का? ऐकलंस का?



कुत्र्यांच भौ भौ
गाढवाचं हॉ हॉ
ऐकलस का? ऐकलंस का?



पोपटाचं विठू विठू
कोकिळेचं कुहू कुहू
ऐकलस का? ऐकलंस  का?



कोल्ह्याच कुई कुई
ऐकलस का? ऐकलंस  का?
मोराचं थुई थुई
पाहिलस का? पाहिलस का?

© BMM Marathi Shala eBook Team

## बार्बीची जंगी पार्टी

बार्बी डॉल माझी भारी ग भारी ग
तिच्या घरी आज पार्टी ग पार्टी ग
सगळ्या बार्बी येणार ग येणार ग
अमेरिकन डॉल पण आहे ग आहे ग
नटून साऱ्या जमणार ग जमणार ग



बार्बीला नेसवली साडी ग साडी ग
नखाला लावले पॉलिश ग पॉलिश ग
गालाला लावली लाली ग लाली ग
आईने घातली वेणी ग वेणी ग

खाऊ काय करू प्रश्न ग प्रश्न ग
आई म्हणते पोहे ग उपमा ग
बाबा म्हणतो वडा ग भजी ग
मला आवडतो पिझ्झा ग पिझ्झा ग

पार्टी awesome झाली ग झाली ग
आता बार्बी  थकली ग थकली ग
तिच्या क्रिबमधे झोपली ग झोपली ग
पुढची पार्टी कधी ग कधी ग ?
नेक्स्ट वीकएंड शिवाय नाही ग नाही ग

© BMM Marathi Shala eBook Team

## एक मोठा डोंगर



हिरवळ बाजूला हो, हिरवळ बाजूला

एक मोठा डोंगर , डोंगराजवळ झाड

हिरवळ बाजूला हो, हिरवळ बाजूला
एक मोठा डोंगर , डोंगराजवळ झाड , झाडावर फांदी
हिरवळ बाजूला हो, हिरवळ बाजूला
एक मोठा डोंगर , डोंगराजवळ झाड , झाडावर फांदी , फांदीवर पाने
हिरवळ बाजूला हो, हिरवळ बाजूला
एक मोठा डोंगर , डोंगराजवळ झाड , झाडावर फांदी , फांदीवर पाने, पानात घरटे

हिरवळ बाजूला हो, हिरवळ बाजूला
एक मोठा डोंगर , डोंगराजवळ झाड , झाडावर फांदी , फांदीवर पाने, पानात घरटे, घरट्यात पक्षी

हिरवळ बाजूला हो, हिरवळ बाजूला

© BMM Marathi Shala eBook Team

एक मोठा डोंगर , डोंगराजवळ झाड , झाडावर फांदी , फांदीवर पाने, पानात घरटे
घरट्यात पक्षी , पक्षांची पिल्ले

हिरवळ बाजूला हो, हिरवळ बाजूला
एक मोठा डोंगर , डोंगराजवळ झाड , झाडावर फांदी , फांदीवर पाने, पानात घरटे
, घरट्यात पक्षी , पक्षांची पिल्ले , पक्षी उडाला

हिरवळ बाजूला हो, हिरवळ बाजूला
(Reference: isw मराठी शाळा)

© BMM Marathi Shala eBook Team

## गोष्टी आणि उतारे

Stories and Comprehension Paragraphs

### तनय चे बक्षिस

आज तनयचा वाढदिवस होता.
आईने खूप फुगे आणले .
हिरवे, पिवळे , निळे, जांभळे, लाल, आणि गुलाबी फुगे !
अजित, आशिष, अनिता, आणि मिता पण आले होते .
सगळे मिळून बागेत गेले.
सगळे फुगे हातात धरून धावत होते .
खूप जोराचा वारा आला , अजित आणि आशिष च्या हातातून फुगे सुटले.
फुगे उडाले, झाडात अडकले. झाडाला होते काटे ! फुगे फटकन फुटले .
अजित आणि आशिषला खदाखदा हसू आले.
पण तनय ला खूप रडायला आले , खूप वाईट वाटले .
आईला बागेतला फुगेवाला दिसला .
तिने सहा नवे फुगे घेतले.
तनयला जवळ घेतले, पापा दिला आणि फुगे बक्षिस दिले .
तनय ला खुद्कन हसू आले . सगळे मिळून खूप हसले.

- अंजली भिडे

<u>प्रश्न</u>

कोणाचा वाढदिवस होता?
वाढदिवसाला कोण आले होते ?
सगळेजण कुठे गेले?
तनय का रडला?
फुगे का फुटले?

© BMM Marathi Shala eBook Team

**गाळलेल्या जागा भरा**

-ळा  - -ळा -ल - - बी

## दूध -कुकी

मी सकाळी उठतो. मग आई मला दूध आणि कुकी देते. आई आणि बाबा चहा पितात. पण आई मला चहा देत नाही. आई रोज वरण आणि भात करते. ती भातावर वरण, तूप आणि मीठ घालते. मग ती भात कालवते आणि मला भरवते. हे जेवण मला खूप आवडते.

प्रश्नः

१. मी सकाळी काय काय खातो?

२. आई आणि बाबा काय पितात?

३. आई भातावर काय काय घालते?

४. तुम्हाला जेवताना काय आवडते?

५ आई मला चहा का देत नाही?



© BMM Marathi Shala eBook Team

**उंदीर**

काल घरात एक उंदीर शिरला आणि कपाटामागे गेला. आईने उंदराला पाहिले. ती घाबरली आणि किंचाळली. मी पण घाबरलो. मी बाबांना बोलावले. बाबांनी काठी घेतली आणि उंदरावर मारली. उंदीर बाहेर आला आणि दारातून पळून गेला. मी पटकन दार बंद केले.

प्रश्नः

१. काल घरात कोण शिरले?

२.उंदीर कुठे गेला?

३. आई का किंचाळली?

४. बाबांनी उंदराला कसे मारले?

५. मी दार पटकन बंद का केले?



© BMM Marathi Shala eBook Team

## शरद आणि लाडू

काल आईने लाडू केले होते. लाडवांचा डबा उंच फळीवर ठेवला. आणि ती बाहेर गेली. शरदला लाडू हवा होता. तो एका लहान टेबलावर चढला आणि डबा काढायला लागला. डबा हातातून सुटला आणि शरद खाली पडला. शरदच्या पायाला लागले. तो रडू लागला. रडणे ऐकून आई आणि बाबा आले. आईने शरदला लाडू दिला. लाडू खाताना शरद हसू लागला.

प्रश्नः

१. आईने लाडू कुठे ठेवले?

२. शरद कुठे चढला?

३. शरद का रडू लागला?

४. आईने शरदला काय दिले?

५. शरद का हसू लागला?



# रविवारची सुट्टी

रविवारची सुट्टी होती. आई म्हणाली, " यश, तुझे कपाट आवर." यशने कपाट उघडले तर त्याच्या अंगावर दोन चार कपडे पडले. कपाटाच्या वरच्या कप्प्यात असलेला एक मोठा चेंडू यशच्या डोक्यावर पडला. यश हसायला लागला. मग यशने सर्व कपडे, खेळणी आणि वह्या बाहेर काढल्या. पेन्सिल, खोडरबर एका डब्यात ठेवले. मग यश आणि आईनी मिळून सर्व वस्तू नीट कपाटात ठेवल्या. खोलीतला कचरा काढला. मग आई यशला जवळ घेऊन म्हणाली "शाब्बास!"

प्रश्नः

१. यश काय करीत होता?

२. कपाट उघडल्यावर यशच्या अंगावर काय पडले?

३. यशच्या कपाटात काय काय होते?

४. यशने आणि आईने सगळ्या गोष्टींचे काय केले?

५. आई यशला “शाब्बास” का म्हणाली?

© BMM Marathi Shala eBook Team

**शब्दशोध** Word search. Find hidden words from the chart below. For example **नळ**. Possible words are given below the chart .

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| र | ज | च | ट | क | न | ळ |
| भ | ठ | ट | ए | म | ग | र |
| क | ढ | ई | क | ल | व | क्ष |
| प | उ | ख | ळ | य | त | अ |
| ब | घ | स | सा | फ | ख | न |
| द | ह | प | ळ | ऊ | ण | न |
| क | थ | आ | ष | ढ | ग | स |

**ढग** **अननस** **एक** **चटई**

**चटकन** **कमल** **मगर** **कढई**

**गवत** **नळ** **उसळ** **ससा**

**उखळ** **बदक** **बघ** **कप**

**पळ** **फणस** **खण** **साप**

© BMM Marathi Shala eBook Team

## इ ई ( इकार )

## इ ऱ्हस्व वेलांटी ि

## ई दीर्घ वेलांटी ी

Unscramble the words and match with verbs and make sentences.

उदाहरण: १. खिडकी बंद कर. २. खिचडी खा. ३. आजी झोपली.

| | | | |
|---|---|---|---|
| डकीखि | मानवि | क्षीप | वीशपि |
| हीणब | डीगाआग | मटीआ | चडीखि |
| ळावपि | छानाबि | शीवमा | जीआ |
| कडीका | सदिव | किरीपत | ठीमरा |
| क्षापरी | रहिवी | मणीचि | वाररवि |

---

| | | | |
|---|---|---|---|
| उडाले | घर | बंद कर | वाच |
| बघ | साडी घाल | काप | वही आण |
| आला | उजाडला | घातला | उघड |
| आली | उडाली | संपली | आंबा खा |
| चाख | उडाला | चालली | झोपली |

## उ ऊ ( उकार)

उ ऱ्हस्व उकार ु

ऊ दीर्घ उकार ू

Translate each marathi word into English and english word into marathi from the given list and write a marathi sentence for each word.

| | | | |
|---|---|---|---|
| मुळा | मुलगी | सासू | गुढगा |
| लाकूड | पूजा | लसूण | हुशार |
| सून | जुना | मुगुट | शूर |
| फूल | तूप | दुपार | दुकान |
| सुतार | कडू | मुलगा | लाडू |
| दूध | तराजू | गुरुजी | जादू |

---

| | | | |
|---|---|---|---|
| flower | girl | sweets | scale |
| worship | crown | milk | bitter |
| teacher | store | radish | talented |
| knee | old | wood | boy |
| garlic | daughter-in-law | | carpenter |
| brave | afternoon | | magic |
| mother-in-law | | | ghee (clarified butter) |

© BMM Marathi Shala eBook Team

## ए ऐ ( मात्रा )

ए एक मात्रा े

ऐ दोन मात्रा

Translate each marathi word into English and english word into marathi from the given list and make sentences in marathi from each word.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| केस | पैसे | सेवा | तेल | सैल | देश |
| ऐक | खेळ | रेघ | तेरा | ढेकूण | इकडे |
| देव | पेढे | मडके | केळ | चेंडू | वेळ |
| शेपूट | बेडूक | मुले | शेत | बैस | बैल |
| कपडे | पाने | फुले | नाणे | तळे | गाणे |

| | | | |
|---|---|---|---|
| banana | farm | here | bed bug |
| listen | time | sit down | song |
| tail | sweets | coin | pond |
| clothes | thirteen | line | play |
| ball | clay pot | country | hair |
| service | loose | oil | bull |
| god | children | flowers | leaves |
| money | frog | | |

© BMM Marathi Shala eBook Team

# ओ औ

ओ काना आणि एक मात्रा ो

औ काना आणि दोन मात्रा ौ

Translate each marathi word into English and english word into marathi from the given list and make sentences in marathi for each word.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| औषध | झोका | ओठ | ओळख | पोट | दोन |
| गोल | बोट | पोळी | मोठा | गौरी | सोळा |
| गोड | चौदा | घोडा | औत | सोमवार | चोर |
| चौकोन | मोर | नोकर | पोपट | चौकशी | भोपळा |
| नौका | चौपाटी | कोबी | दौरा | आजोबा | हौद |

---

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| horse | square | peacock | fourteen | plough | two | big |
| fingers | Monday | servant | sixteen | sweet | thief | parrot |
| swing | inquiry | stomach | circle | pumpkin | lips | |
| medicine | boat | tour | cabbage | grandfather | | |

girl’s name (goddess) Indian bread introduction

water tank beachfront

© BMM Marathi Shala eBook Team

# अं

## अं अनुस्वार ं

Translate each marathi word into English and english word into marathi from the given list and make sentences in marathi for each word.

कांदा खांदा घंटा शंभर चंदन कंबर

आंबा पतंग भांडण अंगठी कंगवा रंग

पंखा मंदिर लोखंड संगीत शंख सुंदर

पंडित भिंत भोंगा अंगण उंच गुंडी

पिंजरा आंघोळ आनंद गंगा मंगळवार उंदीर

---

quarrel bell comb shoulder color onion ring

kite hundred temple cage horn backyard

button tall fan bath sandalwood wise man wall

iron seashell music happy river mango

# अः

## अः विसर्ग

Translate each marathi word into English and english word into marathi from the given list and write a marathi sentence for each word.

| | | |
|---|---|---|
| दुःख | शतशः | नमः |
| उःशाप | विशेषतः | अंशतः |
| उषःकाल | दुःशासन | स्वतः |

---

| | | | |
|---|---|---|---|
| salute | self | specially | |
| minutely | dawn | prince from Mahabharat | |
| many | grief | curse | undone |

# स्तर दुसरा (Level 2 Dusari)

- श्लोक Schlok
- कविता Poems
- गोष्टी आणि उतारे Stories and Comprehension Paragraphs
- जोडाक्षरे Conjunct
- स्वर आणि स्वरचिन्हे Vowels
- लिंग वाचक शब्द Gender nouns
- एकवचन आणि अनेकवचन Singular and Plural

© BMM Marathi Shala eBook Team



© BMM Marathi Shala eBook Team

**श्लोक**

गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु
गुरुर्देवो महेश्वरा:
गुरु: साक्षात् परब्रम्ह:
तस्मै श्री गुरुवे नमः।।



कराग्रे वसते लक्ष्मीः
करमध्ये सरस्वती
करमूले तु गोविन्दः
प्रभाते करदर्शनम ।।



वक्रतुंड महाकाय सूर्यकोटि समप्रभ
निर्विघ्नं कुरुमे देव सर्वकार्येषु सर्वदा ।।

धरी कुंदकांती शिरी घे किरीट
करी दिव्य वीणा मुखी गोड गीत
करी ज्या कृपा त्या शिरी हस्त ठेवी
नमूं शारदा ज्ञान विज्ञान देवी ।।

देवा अन्न दिलेस तू मज तुझे आभार मानू किती
आईनेही पदार्थ सुंदर नवे केले प्रयास किती ॥
वाया ना दवडी अन्नकण मी जेवताना एकदा
देसी तूच सुबुद्धी शक्ती मजला ह्या अन्नरूपे सदा ॥

होऊ देत सुखी सारे सर्वा आरोग्य लाभू दे
मांगल्य सर्व पाहोत न कोणा दु:ख होऊ दे ॥

© BMM Marathi Shala eBook Team

## कविता Poems

### फळे

डाळिंब असते लाल लाल
सफरचंदाचे गुलाबी गाल
आंबा हा तर फळांचा राजा
मला आवडतो पेरू ताजा
अननस फणस काय नाते?
आत गोड़ अंगावर काटे
बघा लाल लाल कलिंगड
आंबट गोड़ द्राक्षाचा घड
मोसंबी संत्री चिकू केळी
फळे आपल्या ओळखीची सगळी



**फळे आपल्या अमेरिकेतली**

स्ट्रॉबेरी असते लालभडक

खाऊन टाकू चटक-मटक

अमेरिकेत फळांचा राजा ब्लूबेरी



मेरिअनबेरी, चेरी , रास्पबेरी
अँपल ची नावे हनी क्रिस्प, गाला
सुंदर रंग पीच आणि कॅन्टलौपला
हिरव्यागार रंगाचे फळ किवी
तपकिरी साल , आत काळेशार बी
पेअर, प्लम, मेलन, बनाना
ओळखीची फळे आपल्या सर्वांना

-अंजली भिडे

© BMM Marathi Shala eBook Team

## **भाज्या सगळ्या खायच्या बरका !**



टोमॅटोचं आवडत ना सूप?
भुरका आता खूप खूप
मी  तांबडा भोपळा
टुणूक टुणूक पळणारा
मी आहे वांगं
माझं भरीत खमंग
आणा कोबी आणा फ्लॉवर
साऱ्यांनाच याची आवड
भेंडी माझी आवडती
चवदार भाजी असते तिची
ही  तर आहे मेथी ताजी
आजी कर ना हिची भाजी
केशरी कंद हिरवा पाला
सारे म्हणती गाजर मला
कांदा  आणि बटाटा यांची
भाजी आवडती सर्वांची

© BMM Marathi Shala eBook Team

**वांग्याचे भरीत**

वांगे रुसले टोपलीवर बसले
कांदा चिडला फळीवर चढला
आजी आली विचार करीत
दोघांचं केलं  झकास भरीत



**आली दिवाळी द्या बघू टाळी**



च च चकली
क  क कडबोळी
श श शंकरपाळी
अनारशाला जाळी
बालुशाही ची खळी
शेवेची वाटोळी
लाडू ला वळी
करंज्या तळी
फ फ फराळी
ताव मारू सगळी
द्या बघू टाळी,  आली दिवाळी

© BMM Marathi Shala eBook Team

## सारे मिळुनी गाणे गाऊ



सा रे ग म प ध नी
बाजाच्या पेटीचा सुरेल ध्वनी
धा धिं धिं धा , तक धिं धिना
दमदार आवाजाचा तबला आणि डग्गा



नाचणारी पावले घेती गोल गिरकी
जोरदार वाजते लंबगोल ढोलकी
तडफदार शिलेदार यांचा आवडता डफ
शिवाजी राजांची ऐटबाज तडफ
टिंग टिंग झांज पीपी बाजा
खंजिरी ऐकताना येते खूप मजा



ताईच्या लग्नात वाजते सनई
ऐकून खूष होतात बाबा आणि आई



श्रीकृष्णाची बासरी मधुर
ऐकायला झाले कान आतुर
साऱ्या वाद्यांचा मेळ जमवू
सारे मिळून गोड़ गाणे गाऊ

अंजली भिडे

© BMM Marathi Shala eBook Team

**झाड गाई  गाणे**



सर सर उंच वाढलं  झाड
बघता बघता ढगांच्या आड ॥१॥

ढगांचं झाल पाणीच पाणी

झाडाला सुचली हिरवी गाणी ॥२॥

गाण्याची झाली फळ आणि फुलं
वेचायला आली मुली  आणि मुलं ॥३॥

© BMM Marathi Shala eBook Team

## अभिनय गीत

हात कडेवर ठेवून
गोला मधे उभे राहू
हातामधे हात घेऊ
गोलगोल फिरताना नाचू गाऊ, नाचू गाऊ ॥१॥

थोडे मागे पुढे जाऊ
डोळे झाकुनिया घेऊ
मागे पुढे चालताना नाचू गाऊ, नाचू गाऊ ॥२॥

जरा लपूनिया बसू
खुसू खुसू गालि हसू
खुसूखुसू हसताना नाचू गाऊ, नाचू गाऊ ॥३॥

टाळी देऊ टाळी घेऊ
टाळी देता घेताना नाचू गाऊ, नाचू गाऊ ॥४॥

© BMM Marathi Shala eBook Team

## गोष्टी आणि उतारे

Stories and Comprehension Paragraphs

तळ्याचं पाणी – चुबुक चुबुक
पाण्यात मासा – डुबुक डुबुक
वाऱ्याची आली –- झुळूक झुळूक
पाणी हललं –- चुळुक चुळुक
मासा गेला –- सुळूक सुळूक

प्रश्न:

१. तळ्याचं पाणी कसा आवाज करतो ?
२. पाण्यात कोण आहे ?
३. वाऱ्याची काय आली ?
४. कुठले शब्द दोन वेळा आले आहेत ?

## एक होती आजीबाई.

तिच्याकडे होती एक मनी माऊ. मनीमाऊचं अंग पांढरे  आणि मऊ मऊ होतं. आजीबाई मनी माऊचे खूप लाड करी. विणकाम करताना तिला मांडीवर बसवी. तिला ताजं दूध प्यायला देई. कधी कधी मनी आजीच्या पायाशी झोपी जाई. कधी खिडकीत बसून आल्यागेल्या माणसाकडे बघत राही. आजीबाईने मनी साठी लोकरीचं झबलं विणलं, कारण लवकरच स्नो पडणार होता. झबलं पण पांढरं आणि मऊ मऊ होतं. आजीने मनीला  झबलं घातलं. मनी खिडकीत बसली. मग भुरुभुरु स्नो पडू लागला. पांढरा  स्नो आणि पांढरं झबलं  घातलेली  पांढरी  मनी बघून आजीला खूप मजा वाटली.



-                                        -अश्विनी देवधर

प्रश्न: १.  ही कोणाची गोष्ट आहे ?
२. मनीमाऊचं वर्णन करा.
३. आजीला मजा का वाटली ?
४. तुमच्या आवडत्या प्राण्याबद्दल ५ वाक्ये लिहा.
५. आजीबाईने झबलं का विणलं ?

गाळलेल्या जागा भरा

१. मनीमाऊचं अंग पांढरं आणि ----- होतं.
२. आजीबाई ------- खूप लाड करी.
३. आजीबाईने मनी साठी -------- विणलं

## ससे- भाऊ झाला शूर

एकदा एक चिमुकला ससा रानात राहत होता.
आई आणि बाबाचा तो खूप लाडका होता .



ससेभाऊ खूप घाबरट होते.
जरा आवाज झाला की कान ट्वकारायचा .
आईला चिकटून बसायचा, तिच्या मागे मागे फिरायचा.

एक दिवस खूप ऊन आले. आकाशात सूर्य तळपू लागला .
ससे भाऊला डोळे उघडे ठेवता येईनात . तो खूप घाबरला.
इकडे तिकडे पळू लागला .
जोरात ओरडू लागला," आई, आई! बघ, बघ वर, आकाश खाली पडतंय"
आईने ससे भाऊला जवळ घेतले. ती म्हणाली, "नाही रे राजा
हा तर आहे उन्हाळा! आकाश कधीच खाली पडत नाही. घाबरू नकोस!"
ससे भाऊला मग उन्हाळ्याची सवय झाली. असे काही महिने गेले .

एकदा खूप जोराचा वारा सुटला .
आकाशात काळे ढग जमले.
ढगांचा मोठा आवाज होऊ लागला .
ससा घाबरला सैरावैरा पळू लागला.
जोरात ओरडू लागला," आई, आई! बघ, बघ वरती! आकाश खाली पडतोय!"

आईने ससे भाऊला जवळ घेतले. ती म्हणाली," नाही रे राजा ,
आता पावसाळा सुरु झाला आहे .आकाश कधीच खाली पडत नाही .घाबरू नकोस!"
ससेभाऊला मग पावसाची सवय झाली. असे काही महिने गेले .

© BMM Marathi Shala eBook Team

एकदा काय झाले, आकाशातून भुरुभुरु बर्फ पडायला लागला .
सगळी जमीन पांढरी झाली.
थंडीने ससे भाऊचे अंग थरथरू लागले.
पण  ससेभाऊ आता मोठा झाला होता.
आता तो भित्रा राहिला नव्हता, शूर झाला होता.
तो आईजवळ गेला आणि म्हणाला,  "बाबांनी  मला सांगितलं की,
आता हिवाळा आला आहे ."
आता मला कळलं आहे.  आकाश कधीच खाली पडत नाही .

- अंजली भिडे

<u>प्रश्न:</u>

ससेभाऊ कोणाबरोबर रहात होता?
पावसाळ्यात  काय होते?
ससे भाऊला कशाची  भीती वाटत होती?
ससे भाऊची भीती का संपली?

गाळलेल्या जागा भरा

ढगांचा मोठा --------- होऊ लागला

ससेभाऊ आई -बाबाचा --------- होता

ससेभाऊ घाबरून--------- पळू लागला

आकाशातून ---------- बर्फ पडू लागला

© BMM Marathi Shala eBook Team

## ओमची सावली

एक वर्षाचा ओम नुकताच चालायला लागला होता. आईचे लक्ष नसताना तो घराबाहेर अंगणात पळाला. अंगणात ऊन पडले होते. ओमनी मागे वळून पाहिले तर काय? एक काळा प्राणी अगदी त्याला चिकटून त्याच्या मागे मागे येत होता. त्याला मारायला ओमने हात वर केला, तर तो प्राणी पण हात वर करायचा. ओम वाकला , की तो देखील वाकायचा. ओम पुढे धावला की तो प्राणी पण धावायचा. ते बघून ओम घाबरला व जोरात रडायला लागला. आईने ते ऐकले, तिने ओमला उचलून घेतले. आता ओमला दोन काळे प्राणी दिसत होते. त्यांच्याकडे बोट दाखवून तो आणखी रडायला लागला. आईला कळले की ओम स्वतःःच्या सावलीकडे पाहून रडत आहे. ती हसली व तिने त्याला घरात नेले.

© BMM Marathi Shala eBook Team

प्रश्न : १) ओमने अंगणात काय पाहिले?

२) तो काळा प्राणी कुठे चालला होता?

३) ओमने हात का वर केला?

४) ओमला दोन प्राणी का दिसले? ५) तुला कोणत्या गोष्टीची भीती वाटते?



© BMM Marathi Shala eBook Team

## एका चपलेची गोष्ट (a story of a flip-flop sandal)

एकदा गांधीजी आगगाडीने जाणार होते. गाडीची वेळ झाली होती म्हणून ते घाईघाईने चालत होते. चालता चालता त्यांची चप्पल पायातून निघाली, व मागे पडली. ते तसेच गाडीच्या डब्यात चढले. एका मुलाने ती उचलली , व तो त्यांना देण्यासाठी धावला. गांधीजींनी पाहिले, की त्या मुलाच्या पायात चपला नाही. तरी देखील तो त्यांना ती चप्पल देत होता. गांधीजींनी स्वतः:च्या पायातली दुसरी चप्पल काढली, व त्या मुलाकडे फेकली. त्याला ओरडून सांगितले की तू दोन्ही चपला घाल. त्याला फार आनंद झाला. तो मुलगा हसला व त्याने नमस्कार केला.

प्रश्न: १) गांधीजी कुठे चालले होते?

२) चालताना काय झाले?

३) मुलाने पहिली चप्पल घेऊन काय केले?

४) गांधीजींनी मग काय केले?

५) तू कधी कोणाला कशी मदत केली? का?

© BMM Marathi Shala eBook Team

## जोडाक्षरे

१) मूळ अक्षरास तेच मूळ अक्षर जोडणे.

ट ठ न प क ल

ट्ट ठ्ठ न्न प्प क्क ल्ल

घट्ट मठ्ठ छिन्न गप्पा चक्क गल्ली

२) उभी रेघ नसलेले अक्षर + दुसरे मूळ अक्षर जोडणे.

क ट ठ ड द ल ह ळ छ

रक्त काट्याने मोठयाने केल्याने साड्या गाड्या ह्याने
गोळ्या

३) उभी रेघ असलेले अक्षर + दुसरे मूळ अक्षर जोडणे.

ग ब भ च म प न ण त
थ ष स

मग्न शब्द अभ्यास मिरच्या म्हैस अन्विता अरण्य हत्ती तथ्य
चष्मा हास्य

४) र अक्षराची जोडाक्षरे

१) अक्षरावर रेफ (रफार)

सूर्य वर्ष गर्व सर्व गर्दी सर्दी पर्व हर्ष निर्णय पर्वत

२) अक्षराला तिरकी रेघ

© BMM Marathi Shala eBook Team

चक्र वक्र पत्र मित्र समग्र ग्राम सर्वत्र कुत्रा छत्री भित्रा श्री

३) अक्षरापुढे अर्धचंद्र

कुऱ्हाड ऱ्हस्व दुसऱ्याला पुऱ्या तऱ्हा गुऱ्हाळ पायऱ्या हिऱ्याची

४) अक्षराखाली दोन पाय

ट्रंक ट्राम मेट्रो ट्रे राष्ट्र ड्रिल ड्रॉइंग ड्रायव्हर

५) अक्षरावर अर्धचंद्र

टॉम टोमॅटो डॉक्टर मॉनिटर हॅट

५) संस्कृत शब्द

कृष्ण मृग संस्कृत वृत्त गृह पृथ्वी कृती कृपा तृषा ऋषी

© BMM Marathi Shala eBook Team

## सराव अभ्यास - जोडाक्षरे

क) मूळ अक्षराला तेच मूळ अक्षर जोडणे. वाचा व लिहा.

ट ठ न प च ल

१. घट्ट = घ + (ट् +ट )

२. मठ्ठ = म+ (ठ् + ठ )

३. अन्न = अ +( न् + न)

४. गप्प = ग + (प् +प)

५. चक्क = च + (क् +क )

ख ) उभी रेघ असलेले अक्षर + दुसरे मूळ अक्षर जोडणे. वाचा व लिहा.

ग ब भ च म प न ण त थ ष स

१. मग्न = म +(ग् +न)

२. शब्द = श + (ब् +द )

३. अभ्यास = अ +( भ् + या )+ स

४. मिरच्या = मि +र+ (च् +या)

५. म्हैस = (म् +है ) +स

६. अन्विता = अ +(न् +वि) +ता

७. चष्मा = च +( ष् + मा )

८. हत्ती = ह ( त् +ती )

ग ) उभी रेघ नसलेले अक्षर +दुसरे मुळाक्षर जोडणे. <u>वाचा व लिहा.</u>

क ट ठ ड द ल ह ळ छ

१. रक्त = र (क् +त)

२. मोठ्याने = मो + (ठ् +या )+ने

३. केल्याने = के +( ल् +या) +ने

४. साड्या = सा (ड्+या)

५. ह्याने = (ह् +या ) +ने

६. काट्याने = का ( ट् + या) +ने

७. गोळ्या = गो +(ळ् +या)

८. खड्डा = ख + ( ड् +डा )

९. पट्टा = प +(ट्+ टा )

१०. त्याने = (त् +या) +ने

© BMM Marathi Shala eBook Team

घ ) र अक्षराची जोडाक्षरे. वाचा व लिहा.

१) अक्षरावर रेफ (रफार)

१. सूर्य = सू +(र् +य)

२. वर्ष = व +( र् +ष )

३. गर्व = ग + (र् +व)

४. गर्दी = ग +(र् +दी )

५. निर्णय = नि+ ( र् + ण ) +य

६. पर्वत = प +(र् +व ) +त

७. अर्धा = अ +(र् +धा )

च )अक्षराला तिरकी रेघ

१. पत्र = प(त् +र)

२. चंद्र = चं (द् +र)

३. नम्रता = न +( म् + र) +ता

४. देवेंद्र = दे+ वें +(द् +र)

५. प्रकाश = (प्+र) +का +श

६. शुभ्र = शु + (भ् +र)

७. भित्रा = भि +(त् +रा )

© BMM Marathi Shala eBook Team

छ ) सराव साधन - खालील दिलेल्या जोडाक्षरे भोवती गोल काढा.

म्हणाला मिरच्या अभ्यास कान्हा उन्हाळा गोळ्या टीव्ही म्हैसूर मल्हार

खालील शब्द पूर्ण करा. - वाचा व लिहा.

ह+ ( त्+ती ) =

शु + (भ् +र) =

स+ मु+ (द् +र) =

सो+(प् +या) =

ना+ वा +(च्+या ) =

ज ) वाचा व लिहा

| | |
|---|---|
| ब्रश | शुक्रवार |
| राज्य | एप्रिल |
| म्हातारी | श्री |

झ ) पुढील वाक्यातील जोडाक्षरे ओळखा व लिहा.

१. मुलांनो गप्प बसा, बोलू नका.

© BMM Marathi Shala eBook Team

२. रक्ताचा रंग लाल असतो.

३. हत्ती अरण्यात राहतात.

४. अन्विता व अनन्या दुसरीत आहेत.

५. म्हैस चारा खात आहे.

६. माझा अभ्यास झाला.

७. पोपटाला मिरच्या आवडतात.

८. घोडे गाड्या ओढत आहेत.

९. टेबलावर पट्टा ठेवलेला आहे.

१०. सुरेश व्यायाम करत आहे.

ट ) वाचा व लिहा.

१. मुंग्यांचे वारुळ

२. गवताच्या काड्या

३. गुरुजींचे वाक्य

४. आईच्या साड्या

५. पक्ष्यांचे घरटे

६. मधमाश्यांचे पोळे

© BMM Marathi Shala eBook Team

ठ ) वाचा. जोडाक्षरे  ओळखा व लिहा.

एका डबक्यात मासोळ्या पोहत होत्या.

झाडाच्या सावलीत ससा उड्या मारत होता.

चप्पल काढून अक्का घरात आल्या.

म्हातारे आजोबा चष्मा लावून पुस्तक वाचत होते.

ड ) दुसरी  सराव अभ्यास - स्वर व स्वरचिन्हे

**अ आ इ ई उ ऊ ए ऐ**

**ओ औ अं अ:**

ा ि ी ु ू े ौ ो ौ ं

ः

ढ ) **बाराखडी  संधीफोड करुन लिहा.**

उदा - तराजू = (त् + अ ), (र् +अ ) , (ज् +ऊ )

१) मुलगा

२) चेंडू

३) चौपाटी

४) आंघोळ

५) कंगवा

६) विनोद

७) हिवाळा

८) मंगळवार

९) एकोणीस

१०) आजोबा

११) वरून

१२) टरबूज

१३) उडाली

१४) कचोरी

१५) गौरी

१६) पैसे

१७) आणि

१८) हिमालय

१९) सरोवर

२०) टेकडी

© BMM Marathi Shala eBook Team

## दुसरी सराव अभ्यास - लिंग , वचन, क्रियापद

**प्रश्न - कंसातील योग्य क्रियापदाभोवती गोल काढा .**

१) गाडी वेगाने निघून ( गेली, गेला )

२) आम्ही दसऱ्याला मिठाई (वाटते , वाटतो)

३) मला लाल रंग ( आवडते , आवडतो)

४) सूर्य दिवसा (दिसतो, दिसते )

५) माकडाच्या तोंडाला पाणी (सुटला . सुटले)

६) माझ्या जवळ एक हत्ती (होता , होते)

७) राधा रोज रात्री ९ वाजता (झोपते , झोपतो)

८) माधवला खूप मजा (वाटली , वाटल्या )

९) एक माणूस कुऱ्हाडीने झाड तोडत (होता , होती )

१०) तो माणूस किशोरला (रागावला , रागावले)

© BMM Marathi Shala eBook Team

# प्रश्न - वचन बदला व पुन्हा लिहा

| एकवचन | अनेकवचन |
|---|---|
| टोपी | |
| फळ | |
| दार | |
| बैल | |
| घर | |
| वेळ | |
| देऊळ | |

© BMM Marathi Shala eBook Team

**प्रश्न - क्रियापदाचे योग्य रूप घालून पूर्ण वाक्य लिहा.**

उदा - गाय दूध _______ (देणे) गाय दूध देते.

१) विमान उंच ______ (उडणे)

२) राजू पुस्तक______ (वाचणे)

३) घोडा गवत_______ (खाणे)

४) बाग सुंदर _____ _ (दिसणे)

५) वाघ जंगलात_____ (राहणे)

६) बाळ खुदूखुदू ____ (हसणे)

**प्रश्न - खालील शब्दांपैकी क्रियापदा भोवती गोल काढा .**

दिला , नाही , नागपूर , पडली , म्हणाली, राजेश, शहाणा, आजी, जेवली, झाली, अशोक , चमकली , लाडू , करा, चौदा , भेळ , खा, झोपा, आता, पळू, नको

© BMM Marathi Shala eBook Team

**प्रश्न - योग्य क्रियापद वापरुन वाक्य पूर्ण करा.**

उदा - आईला आनंद झाला.

१) हिवाळ्यात बर्फ ___________

२) पोपट हिरव्या रंगाचा __________

३) आमची शाळा साडेबारा वाजता _____________

४) लता मंगेशकर सुंदर गाणे ___________

५) मांजर डोळे बंद करून दूध _________

६) आपण डोळ्याने ____________

७) मी रोज अभ्यास ____________

© BMM Marathi Shala eBook Team

# स्तर तिसरा (Level 3 तिसरी)

- श्लोक
- कविता
- गोष्टी आणि उतारे
- जोडाक्षरे
- शब्दशोध



© BMM Marathi Shala eBook Team

## श्लोक

या कुंदेंदुतुषारहारधवला या शुभ्रवस्त्रावृता
या वीणावरदंडमंडितकरा या श्वेतपद्मासना ।
या ब्रह्माच्युतशंकरप्रभृतिभिदेवैः सदा वंदिता
सा मां पातु सरस्वती भगवती निःशेष जाड्या पहा ।।

मना सज्जना भक्तिपंथेचि जावे
तरी श्रीहरी पाविजेतो स्वभावे
जनीं निंद्य ते सर्व सोडोनि द्यावे
जनीं वंद्य ते सर्व भावे करावे ।।

प्रारंभी विनंती करू गणपती विद्यादयासागरा
अज्ञानत्व हरोनि बुद्धिमती दे आराध्य मोरेश्वरा
चिंता क्लेश दरिद्र दुःख अवघे देशांतरा पाठवी
हेरंबा गणनायका गजमुखा भक्ता बहू तोषवी ।।

डोळ्यांनी बघतो, ध्वनी परिसतो कानी, पदी चालतो
जिव्हेने रस चाखितो, मधुरही वाचे आम्ही बोलतो ।
हाताने बहुसाल काम करतो, विश्रांतीही घ्यावया
घेतो झोप सुखे, फिरोनि उठतो ही ईश्वराची दया ।।

पहिला नमस्कार करितो देवाला
घातले जन्माला ज्याने मज ॥
दुसरा नमस्कार आईला करीन
प्रेमाला सर न जिच्या येई ॥
तिसरा नमस्कार बाबाच्या पायी
ठेवूनिया डोई करिन मी ॥
चवथा नमस्कार गुरुजी तुम्हाला
शिकविले मला प्रेमे तुम्ही ॥
पाचवा नमस्कार जन्मभूमी तुला
वाहीन देहाला तुझ्या चरणी ॥

शुभंकरोति कल्याणम् आरोग्यम् धनसंपदा
शत्रुबुद्धी विनाशाय दीपज्योती नमोस्तुते ॥
दिव्या दिव्या दीपत्कार
कानी कुंडल मोतीहार
दिव्याला पाहून नमस्कार
दिवा लावला देवापाशी
उजेड पडला तुळशीपाशी
माझा नमस्कार सर्व देवांच्या पायापाशी ॥
तिळाचे तेल कापसाची वात
दिवा जळू दे सारी रात
घरातली ईडा -पीडा बाहेर जावो
माहेरची लक्ष्मी घरात येवो

घरच्या सर्वांना उदंड आयुष्य लाभो ॥

कराग्रे वसते लक्ष्मि :
कर मध्ये सरस्वति ॥
कर मुले तू गोविन्द :
प्रभाते कर दर्शनम ॥

सकाळी उठोनी देवासी भजावे
गुरूसी वंदावे जीवे भावे ॥
वडिलांची आज्ञा घेतल्यावाचून
कधी घरातून जाऊ नये ॥
नको शिवीगाळी मारामारी करू
सांगतील गुरु ऐकावे ते ॥

ज्या ज्या ठिकाणी मन जाय माझे
त्या त्या ठिकाणी निज रूप तुझे ।
मी ठेवितो मस्तक ज्या ठिकाणी
तेथे तुझे सद्‌गुरू पाय दोन्ही ॥

वदनी कवळ घेता , नाम घ्या श्रीहरीचे
सहज हवन होते , नाम घेता फुकाचे ।
जीवन करी जिवित्वा , अन्न हे पूर्णब्रह्म
उदरभरण नोहे , जाणिजे यज्ञकर्म ॥

© BMM Marathi Shala eBook Team

## फुलांचे गाणे

गुलाब आहे फुलांचा राजा
मोगरा आहे बघा किती ताजा
तलावात हे कमल फुले
सूर्यफूल हे पाण्यावर डुले
चाफा करतो मन धुंद
लालचुटुक सुरेख जास्वनंद
आवडतात मला ट्यूलिपचे रंग
मंग्नोलियाचा किती गोड़ गंध
डॅफोडिल आयरिसचा सुवास मंद
फुले देतात मला खूप आनंद

अंजली भिडे

## लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी

लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी

लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी
जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी
धर्म, पंथ, जात एक जाणतो मराठी
एवढ्या जगात माय मानतो मराठी
[ १ ]  बोलतो मराठी, ऐकतो मराठी
जाणतो मराठी, मानतो मराठी
आमुच्या मनामनात दंगते मराठी
आमुच्या रगारगात रंगते मराठी
आमुच्या उराउरात स्पंदते मराठी
[ २ ] आमुच्या नसानसात नाचते मराठी
बोलतो मराठी, ऐकतो मराठी
जाणतो मराठी, मानतो मराठी
आमुच्या पिलापिलांत जन्मते मराठी
आमुच्या लहानग्यांत रांगते मराठी
आमुच्या मुलामुलींत खेळते मराठी
आमुच्या घराघरांत वाढते मराठी
[ ३ ]  बोलतो मराठी, ऐकतो मराठी
जाणतो मराठी, मानतो मराठी

- सुरेश भट

© BMM Marathi Shala eBook Team

**सॅन्डविच**

एकदा साहिलला लागली भूक
ताईने दिले सॅन्डविच सूप



सँडविच होते मसालेदार
साहिलला लागले तिखट फार

तोंडाची झाली आग आग
साहिलला आला भलताच राग

रागावर औषध काय तरी?
एक भली मोठी कॅडबरी

## सुरवंट राव

सुरवंट राव उदास झाले
पानेच पाने खातच सुटले
खाऊन खाऊन सुस्त झाले
कोष गुरगुटून झोपून गेले

खूप दिवसांनी झोपून उठले
तर एक मोठे नवलच घडले

उठल्या उठल्या आले खुशीत
"हे काय भलतच ! हे काय आक्रीत !
आज मला हे अस काय होतंय
इकडून तिकडे उडावे वाटतंय"

पाहतात राव तर जादूच केवढी
पाठीवर फुटलेली पंखांची जोडी




© BMM Marathi Shala eBook Team

**पर्यावरण प्रार्थना....**

“भारत माझा देश आहे,पण हे संपूर्ण विश्वही माझेच आहे.या विश्वातील सर्व मानवांचा मी जसा आदर करतो,तसाच,सर्व छोट्या ,मोठ्या सजीव प्राण्यांचा ,आणि वनस्पतींचाही करतो,आणि त्यांचे रक्षण करणे हे मी माझे कर्तव्य समजतो.
निसर्गाचे रक्षण करणे,संवर्धन करणे, यासाठी मी बांधिल आहे.आणि मी प्रतिज्ञा करतो की मी आजन्म त्यासाठी माझे तन,मन,धन वाहीन.

...... चित्रा मेहेंदळे

खालील शब्दांचे अर्थ सांगा

१. पर्यावरण
२. कर्तव्य
३. रक्षण
४. संवर्धन

खालील शब्द वापरून वाक्य तयार करा

१. आदर
२. प्रतिज्ञा
३. विश्व

खालील प्रश्नांची उत्तरे लिहा
१. निसर्गाचे रक्षण का केले पाहिजे?
२. या उताऱ्यात कशासाठी प्रार्थना केली आहे?
३. पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी कुठल्या तीन गोष्टी आपल्याला करता येतील?

प्रश्नोत्तरे....
आपण काय करायचे?
१)झाडांच्या अभावी ,
पावसाने केली कट्टी,
आणि रागा रागाने ,
घेतली मोठ्ठी सुट्टी!

चालेल कां?...... नाही ना?

मग आपण काय करायचं?
खूप झाडे लावायची...
झाडे तोडायची?.... नाहीत!

२).....हॉटेलात होती पार्टी
समोर “यम्मी “डिशची गर्दी..
एवढसं माझं ...एकच पोट,
पिझ्झा खाऊन झालं मोठ्ठं!

आता उरलेलं काय करायचं?
फेकलं तर चालेल का? नाही ना?

© BMM Marathi Shala eBook Team

मग आपण काय करायचं?
हवं तेवढं मागायचं
अन्न वाया घालवायचे ?..... नाही!

३) कार्टूनच्या दुनियेत असते मज्जा
खेळताना गेम्स,दिवस जातो सारा,
होमवर्क नाही झाला, होईल आता सजा
अभ्यासाचा आता आवरायचा कसा पसारा

अभ्यास नाही केला तर चालेल का?
नाही ना?

मग आपण काय करायचे?
वेळच्या वेळी, मनापासून अभ्यास करायचा!
पूर्ण वेळ मज्जा करण्यात घालवायचा का ?......... नाही.

© BMM Marathi Shala eBook Team

## कुत्र्याचे पिल्लू

अनुजाला शाळेतून परत येताना एका खांबावर एक कागद चिकटवलेला दिसला. त्यात लिहिले होते “ माझे छोटेसे कुत्र्याचे पिल्लू हरवले आहे.”- मेगन. पिल्लू सापडले  तर मेगनच्या घरी कळवा असेही लिहिले होते.

अनुजा रस्त्यावरून पुढे घराकडे निघाली.  खूप कडक ऊन पडले होते.  तेवढ्यात अनुजाला रस्त्याच्या कडेला एक लहानसे कुत्र्याचे पिल्लू दिसले. उन्हामुळे ते थकले होते.  अनुजाने त्याला हातात उचलून घेतले, तिच्याजवळ पाण्याची बाटली होती. त्या बाटलीतले थोडे पाणी हातात घेऊन तिने त्याला पाजले. मग त्याला थोडी हुशारी आली आणि ते तिचा हात चाटू लागले.  ती त्याला घेऊ घरी आली. तिने आईला ते पिल्लू आणि कागद दाखवला. मग आईने मेगनच्या  घरे फोन करून एक कुत्र्याचे पिल्लू सापडले आहे असे कळवले.

**प्रश्न**

१. कागदावर काय लिहिले होते ?

२. कुत्र्याचे पिल्लू कुठे दिसले आणि ते कसे होते ?

३. अनुजाने पिल्लाला पाणी कसे दिले ?

४. पाणी प्यायल्यावर पिल्लू काय करू लागले ?

५. पिल्लाला घरी आणल्यावर आईने काय केले ?

© BMM Marathi Shala eBook Team

## लेगो

अर्जुनला सकाळी लवकर उठायचा कंटाळा येतो. पण हे अर्जुनच्या आईला अजिबात आवडत नाही. ती जोरजोरात हाक मारून त्याला उठवते. मग तो कंटाळून उठतो. पण आज रविवार असूनही तो लवकर उठला कारण आज त्याची मावशी अमेरिकेहून येणार होती. ती त्याच्यासाठी गम्मत आणणार होती. थोड्या वेळाने मावशी आली. जेवण, गप्पागोष्टी झाल्यावर मावशीने आपली बॅग उघडली आणि दोन डबे काढले. एका डब्यामध्ये अर्जुनाची आवडती चॉकलेट्स होती आणि दुसऱ्या डब्यामध्ये रंगीबेरंगी ठोकळ्यांचा ‘लेगो ‘ हा खेळ होता.

अर्जुनने लेगोचे निळ्या, हिरव्या, पिवळ्या, केशरी, लाल, काळ्या आणि पांढऱ्या रंगांचे ठोकळे काळजीपूर्वक बाहेर काढले. हे ठोकळे एकमेकांत बसवून बिल्डिंग, घर, गाडी, आगगाडी, विमान असे वेगवेगळे आकार तयार करता येतात. मावशीने सांगितले की अमेरिकेत तर लेगोचे पार्क देखील आहे. तिथे हे ठोकळे वापरून शहराचा देखावा तयार केलेला आहे. अर्जुनला लेगो इतका आवडला की तो चॉकोलेट खायचे विसरून गेला.

**प्रश्न:** १. अर्जुन सकाळी लवकर का उठला ?

२. अर्जुनच्या मावशीने कोणत्या गंमती आणल्या ?

३. लेगो हा खेळ कसा असतो ?

४. लेगो ह्या खेळात काय काय बनवता येते ?

५. अमेरिकेत पार्कमध्ये लेगो वापरून काय बनवले आहे ?

© BMM Marathi Shala eBook Team

## ख्रिसमस ट्री

वरती निमुळते, टोकदार आणि खाली सुंदर फ्रॉकसारखा घेर असलेले झाड ख्रिसमसच्या दिवशी घराघरात दिसते. हिरव्यागार फांद्या आणि त्यावर केलेली सजावट असे त्याचे देखणे रूप असते. हे झाड म्हणजे ख्रिसमस ट्री, कधी टेबलावर ठेवण्याइतके छोटे तर कधी अंगणात ठेवता येईल इतके मोठे असते.

हिवाळ्यातल्या बर्फात सुद्धा नेहेमी हिरवे राहणारे असे हे झाड. ह्याची पाने नेहेमी ताजी राहतात आणि ह्या झाडांची कोणत्या ऋतूमध्ये पानगळ होत नाही. २५ डिसेंबर हा येशू ख्रिस्ताचा जन्मदिन ख्रिसमस म्हणून साजरा करतात. रंगीबेरंगी अलंकार, चांदण्या, खेळणी, लखलखणारे दिवे, कागदाची फुले अश्या सजावटीच्या अनेक वस्तूंनी हिरव्यागार ख्रिसमस ट्री ला सजवतात. झाडाच्या टोकाला सगळ्यात वरती तारा लावला जातो. कधी कधी त्यावर चॉकलेट आणि कँडीज लटकवतात. ख्रिसमस ट्रीच्या खाली खेळण्यातील आगगाड़ी आणि अवतीभवती भेटवस्तू मांडतात.

हे झाड छान सजवले की सॅन्टाक्लॉज खुश होईल आणि आपल्याला भेटवस्तू देईल असे लहान मुलांना वाटते. सजवलेल्या झाडामुळे घरात उत्साही, आनंदी वातावरण तयार होते. म्हणूनच केवळ ख्रिश्चनच नव्हे तर इतर घरातूनही ख्रिसमस ट्री सजवले जाते.

© BMM Marathi Shala eBook Team

**प्रश्न :**

१. ख्रिसमस ट्री चा आकार कसा असतो ?

२. त्या झाडात काय विशेष आहे ?

३. ख्रिसमस ट्री सजवण्यासाठी काय वापरतात ?

४. लहान मुले ख्रिसमस ट्री का सजवतात ?

५. ख्रिश्चन लोकांप्रमाणे इतर लोकही ख्रिसमस ट्री का सजवतात ?



© BMM Marathi Shala eBook Team

**शब्द समूह: समूहदर्शक शब्द : ( Collective noun)**

**समूहदर्शक शब्द - एकापेक्षा जास्त वस्तू किंवा घटक यांना दर्शविण्यासाठी ज्या शब्दांचा वापर केला जातो त्यांना समूहवाचक शब्द असे म्हणतात. समूह म्हणजे group.**

**उदाहरणार्थ :**

कागदांचा - गठ्ठा

पुस्तकांचा - संच, ढीग, गठ्ठा

कपड्यांचा - ढीग

पक्ष्यांचा - थवा

फुलांचा - गुच्छ

फळांचा - घोस, घड

मुलांचा, मुलींचा - घोळका

माणसाची - जथा, घोळका, जमाव, गर्दी

धान्याची रास

दगडांची रास

किल्ल्यांचा जुडगा

प्राण्यांचा कळप

गवताची /चा - गंजी, पेंढी, भारा

सैनिकांची / चे - तुकडी, पलटण, पथक

खेळाडूंचा - संघ

चोरांची - टोळी

लाकडांची - मोळी

तारकांचा / ताऱ्यांचा - पुंज

© BMM Marathi Shala eBook Team

काजव्यांचा - पुंजका

जहाजांचा - काफिला

विमानांचा - ताफा

नाण्यांची - चळत / चवड

नोटांचे / ची - पुडके, बंडल, भेंडोळे, थप्पी

भाकऱ्यांची - चळत / चवड

मडक्यांची - उतरंड

**जोडाक्षरे**

१. च् + या = च्या

घराच्या, त्याच्या, शरदच्या, बागेच्या, तुमच्या

२. झ् + या = झ्या

माझ्या, तुझ्या

३. ट + या = ट्या

गोट्या, छोट्या, वाट्या

४. ग् + या = ग्या

मुंग्या, वांग्याची, चिंग्या

५. ळ + या = ळ्या

पोळ्या, गोळ्या, मोळ्या

६. ठ + या = ठ्या

© BMM Marathi Shala eBook Team

मोठ्या, गाठ्या, लाठ्या, काठ्या

७. ल + या = ल्या

आपल्या, सावल्या, टिकल्या, बादल्या

८. प् + या = प्या

टोप्या, सोप्या, तिरप्या, शिंप्याचे, गोप्याचा

९. ठ + ठ = ठ्ठ

चिठ्ठी, मठ्ठ

१०. ट + ट = ट्ट

घट्ट, शिट्टी, पट्टा

११. ड + ड = ड्ड

खड्डा, चड्डी, अड्डा

१२. क् + क् = क्क

धक्का, चक्क, पक्का, आक्का, बुक्का

**१. अक्षरावर रफार** ( वाचा व लिहा )

सूर्य = सू + ( र + य )

© BMM Marathi Shala eBook Team

वर्ष = व + ( र + ष )

गर्व = ग + ( र + व )

गर्दी = ग + ( र + दी )

निर्णय = नि + ( र + ण ) य

पर्वत = प + ( र + व ) त

अर्धा = अ + ( र + धा )

२. **अक्षराला तिरकी रेघ** ( वाचा व लिहा )

पत्र = प + ( त + र )

चंद्र = चं + ( द + र )

नम्रता = न + ( म् + र ) ता

देवेंद्र = दे + वें + ( द + र )

प्रकाश = ( प् + र ) + का + श

शुभ्र = शु + ( भ् + र )

भित्रा = भि + ( त + रा )

**३. अक्षरापुढे अर्धचंद्र** ( वाचा व लिहा )

कुऱ्हाड = कु + ( र + हा ) ड

तऱ्हा = त + ( र + हा )

ऱ्हस्व = ( र + ह ) + स्व

दसऱ्याला = द + स + ( र + या ) + ला

पायऱ्या = पा + य + ( र + या )

हिऱ्याची = हि + ( र + या ) ची

**४. अक्षराखाली दोन पाय** ( वाचा व लिहा )

ट्राम = ( ट + र + आ ) + म

© BMM Marathi Shala eBook Team

राष्ट्र = रा + ( ष + ट + र )

मेट्रो = मे + ( ट + र + ओ )

ड्रम = ( ड + र ) + म

ट्रे = ( ट + र + ए )

**५. अक्षरावर अर्धचंद्र** ( वाचा व लिहा )

बॅग = ( ब् + ऍ ) + ग

कॅमेरा = ( क् + ऍ ) + मे + रा

ऑगस्ट = ( ऑ ) + ग + ( स् + ट )

रॉकेट = ( र + ऑ ) + के + ट

कॉफी = ( क् + ऑ ) + फी

**ऍ आणि ऑ असलेल्या अक्षरांभोवती गोल काढा.**

गॅस, टोमॅटो, गॅदरिंग, मॅगी

चॉकोलेट, हॉटेल, कॅडबरी, बॅटिंग

© BMM Marathi Shala eBook Team

**खालील उतारा वाचा आणि उताऱ्यातील त्याच अक्षराला तेच अक्षर जोडलेले जोडाक्षरी शब्द शोधा आणि लिहा**

शाळेला सुट्टी लागली. मी आणि पल्लवीने हट्ट केला म्हणून आमचे मम्मी पप्पा आम्हाला सर्कस बघायला नेणार आहेत. त्यानंतर आम्ही प्राणिसंग्रहालय बघायला जाणार आहोत. तिथे चित्ता, हत्ती, अस्वल, सिंह, इत्यादी प्राणी बघणार त्यानंतर गाडीत बसणार. येताना भेळपुरी खाणार व लस्सी पिणार. खूप मज्जा येईल.

**फोड केलेले शब्द पूर्ण करा.**

१. दु + ( र + वा ) =

२. मु + ( ख् + य ) =

३. पु + ( ण + य ) =

४. व + ( र + तु ) + ळ =

५. दि + ( ल + ली ) =

६. पू + ( र + व ) =

७. शु + ( क् + र ) + वा + र =

© BMM Marathi Shala eBook Team

८. आ + ( ग् + र ) + ह =

९. ( म् + हा ) + ता + री =

१०. ति + स + ( र + या ) + ला =

११. त + ( र + हा ) =

**खालील शब्द वाचा व जोडाक्षरे फोड लिहा**

नमस्कार, भास्कर, स्टेशन, पोस्टमन, मस्त
रस्ता, स्वाती, गप्पा, अन्न, मीनाच्या, अण्णा, कच्चा

## स्तर चौथा (Level 4 Chauthi)

- श्लोक
- कविता
- गोष्टी आणि उतारे
- जोडाक्षरे
- जोडशब्द
- समानार्थी आणि विरुद्धार्थी शब्द



© BMM Marathi Shala eBook Team

## श्लोक

आदित्यस्य नमस्कारां ये कुर्वन्ति दिने दिने ।
जन्मांतर सहस्त्रेषु दारिद्र्य नोप जायते ।।
अकालमृत्यु हरणं सर्वव्याधीविनाशनं ।
सूर्योपादोदकं तीर्थं जठरे धारयाम्यहं ।।

ओम सहनाववतु सहनौभुनक्तु सहवीर्यम करवावहै
तेजस्वि नावधीतमस्तु माँ विद्‌विषावहै
ओम शांतिः शांतिः शांतिः ।।

© BMM Marathi Shala eBook Team

सदासर्वदा योग तुझा घडावा
तुझे कारणी देह माझा पडावा
उपेक्षू नको गुणवंता अनंता
रघूनायका मागणे हेचि आता ।।

आस ही तुझी फार लागली
दे दयानिधे बुद्धी चांगली
देऊ तू नको दुष्ट वासना
तूच आवरी आमुच्या मना ।।

प्रभाते मनीं राम चिंतीत जावा
पुढे वैखरी राम आधी वदावा
सदाचार हा थोर सांडू नये तो
जनीं तोचि तो मानवी धन्य होतो ।।

मना वासना दुष्ट कामा न ये रे
मना सर्वथा पापबुद्धी नको रे
मना धर्मता नीति सोडू नको हो
मना अंतरी सार विचार राहो ।।

© BMM Marathi Shala eBook Team

कविता

श्रावण मासी हर्ष मानसी हिरवळ दाटे चोहीकडे
क्षणात येते सरसर शिरवे क्षणात फिरुनी उन पडे

वरती बघता इंद्रधनुचा गोफ दुहेरी विणलासे
मंगल तोरण काय बांधले नभोमंडपी कुणी भासे

झालासा सूर्यास्त वाटतो सांज अहाहा तो उघडे
तरू शिखरांवर, उंच घरांवर पिवळे पिवळे उन पडे

उठती वरती जलदांवरती अनंत संध्या राग पहा
सर्व नभांवर होय रेखिले सुंदरतेचे रूप महा

बलाकमाला उडता भासे कल्पसुमांची माळचि ते

उतरूनी येती अवनीवरती ग्रहगोलचि की एकमते

फडफड करून थकले अपुले पंख पाखरे सावरती
सुंदर हरणी हिरव्या कुरणी निजबाळांसह बागडती

खिल्लारे ही चरती रानी गोपही गाणी गात फिरे
मंजूळ पावा गाई तयांचा श्रावण महिना एकसुरे

सुवर्ण चंपक फुलला विपिनी रम्य केवडा दरवळला
पारिजातहि बघता भामा रोष मनीचा मावळला

© BMM Marathi Shala eBook Team

सुंदर  परडी घेऊनि हाती पुरोपकंठी शुध्दमती
सुंदर बाला त्या फुल माला रम्य फुले पत्री खुडती

देव दर्शना निघती ललना हर्ष मावेना हृदयात
वदनी त्यांच्या वाचून घ्यावे श्रावण महिन्याचे गीत

- बालकवी

© BMM Marathi Shala eBook Team

## जयोस्तुते श्रीमहन्मंगले !

जयोस्तुते श्रीमहन्मंगले ! शिवास्पदे शुभदे
स्वतंत्रते भगवती ! त्वामहं यशोयुतां वंदे

राष्ट्राचे चैतन्य मूर्त तू नीती-संपदांची
स्वतंत्रते भगवती ! श्रीमती राज्ञी तू त्यांची
परवशतेच्या नभात तूची आकाशी होसी
स्वतंत्रते भगवती ! चांदणी चमचम लखलखसी
वंदे त्वामहं यशोयुतां वंदे

गालावरच्या कुसुमी किंवा कुसुमांच्या गाली
स्वतंत्रते भगवती ! तूच जी विलसतसे लाली
तू सूर्याचे तेज, उदधीचे गांभीर्यहि तूची
स्वतंत्रते भगवती ! अन्यथा ग्रहण नष्ट तेची
वंदे त्वामहं यशोयुतां वंदे

मोक्ष-मुक्ति ही तुझीच रूपे तुलाच वेदांती
स्वतंत्रते भगवती ! योगिजन परब्रम्ह वदती
जे जे उत्तम उदात्त उन्नत महन्मधुर ते ते
स्वतंत्रते भगवती ! सर्व तव सहचारी होते
वंदे त्वामहं यशोयुतां वंदे

हे अधम-रक्तरंजिते, सुजन पूजिते, श्रीस्वतंत्रते
तुजसाठि मरण ते जनन, तुजवीण जनन ते मरण
तुज सकल चराचर शरण, चराचर शरण, श्रीस्वतंत्रते

वंदे त्वामहं यशोयुतां वंदे -कवी वीर सावरकर

© BMM Marathi Shala eBook Team

## चेस

चेस किंवा बुद्धिबळ ह्या बैठ्या खेळाची सुरुवात भारतात झाली. सुमारे १५०० वर्षांपूर्वी , या खेळाला चतुरंग असे नाव होते. आता सर्व देशात चेस खेळाला जातो आणि या खेळाचे नियम जगभर सारखे आहेत. लहान मुलांपासून मोठ्यांपर्यंत कोणीही हा खेळ खेळू शकतो. मात्र दोनच माणसांनी खेळण्याचा हा खेळ आहे.

हा खेळ एका चौरस पटावर खेळाला जातो, त्यावर काळ्या-पांढऱ्या रंगाच्या चौकडीची ६४ घरे असतात. पहिला खेळाडू पांढऱ्या , तर दुसरा काळ्या सोंगट्यांनी खेळतो. या सोंगट्यांना मोहरे म्हणतात. प्रत्येक खेळाडूकडे एका रंगाचे सोळा मोहरे असतात.

चेस हा खेळ बुद्धीचा वापर करून , डावपेच आखून जिंकावा लागतो. त्यामुळे विचार करण्याची शक्ती वाढते , आणि बुद्धीला चालना मिळते.

चेस खेळताना माणसे इतकी रंगून जातात की , त्यांना वेळेचे भान राहत नाही . काहीही न बोलता, वेगवेगळ्या भाषा बोलणारी माणसे हा खेळ एकमेबरोबर खेळू शकतात .  बुद्धिबळ म्हणजेच चेस म्हणूनच सर्वांच्या आवडीचा आहे.

प्रश्न

१) चेस या खेळाला मराठीत काय म्हणतात?

२) हा खेळ खेंण्यासाठी कोणते साहित्य लागते?

३) मोहरे म्हणजे काय /

४) चेस हा खेळ जिंकण्यासाठी काय करावे लागते ?

५) हा खेळ जगात सगळीकडे आवडीने का खेळला जातो ?

६) १५०० वर्षांपूर्वी या खेळाचे नाव काय होते?

© BMM Marathi Shala eBook Team

## जोडशब्द

शब्दाचा अर्थ अधिक स्पष्ट व्हावा म्हणून काही शब्दांची पुनरावृत्ती केली जाते. त्यामुळे बोलणे लिहिणे डौलदार वाटते. एकाच अर्थाने दोन शब्द जोडून हे तयार होणारे जोडशब्द मराठी भाषेत आगळीच गंमत आणतात. नमुना म्हणून पुढील जोड शब्द पहा.

मराठीत चार प्रकारचे असे जोडशब्द दिसतात.

१. एक शब्द दोनदा येणे- कटकट, लालेलाल, जवळजवळ.

२. पहिल्या शब्दाच्या अर्थाचा दुसरा शब्द- जवळपास, अक्राळविक्राळ, गाठभेट.

३. पहिल्या शब्दाचा उलट अर्थाचा दुसरा शब्द- चढउतार, एकटंदुकट, बरेवाईट.

४. दुसऱ्या शब्दातील एखादे अक्षर बदलून जोडशब्द तयार होतो- अर्धामुर्धा, साधासुधा, अघळपघळ.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | कटकट | १६ | वादविवाद |
| २ | पटापट | १७ | लहानमोठे |
| ३ | लालेलाल | १८ | उठबस |
| ४ | भसाभस | १९ | आईवडील |
| ५ | समोरासमोर | २० | पुढेमागे |
| ६ | कुरकुर | २१ | उलटसुलट |
| ७ | धडधड | २२ | आतबाहेर |
| ८ | थुईथुई | २३ | इकडेतिकडे |

© BMM Marathi Shala eBook Team

| | | | |
|---|---|---|---|
| ९ | धावपळ | २४ | चटकमटक |
| १० | धडपड | २५ | अरबट चरबट |
| ११ | वादळवारा | २६ | अर्धामुर्धा |
| १२ | धक्काबुक्की | २७ | अक्राळविक्राळ |
| १३ | अधूनमधून | २८ | ऐसपैस |
| १४ | केरकचरा | २९ | थाटमाट |
| १५ | नवाकोरा | ३० | भाजीपाला |

© BMM Marathi Shala eBook Team

## समानार्थी आणि विरुद्धार्थी शब्द

एखाद्या शब्दासाठी त्याच अर्थाचा दुसरा शब्द म्हणजे समानार्थी शब्द . म्हणजेच ज्या शब्दांचा अर्थ समान असतो त्यांना ‘समानार्थी शब्द‘ म्हणतात.

समानार्थी आणि विरुद्धार्थी शब्दांमध्ये काय फरक आहे?

विरुद्धार्थी शब्द असे शब्द आहेत ज्यांचा अर्थ दुसऱ्या शब्दाच्या अगदी बरोबर उलट आहे. योग्य प्रतिशब्द निवडल्याने तुमचे लेखन शुद्ध होते. सामान्य विरुद्धार्थी शब्द शिकल्याने तुमची भाषेची जाण अधिक तीक्ष्ण होते आणि तुमचा शब्दसंग्रह विस्तृत होतो.

### समानार्थी शब्द

| | |
|---|---|
| अग्नी= विस्तव: | पुरुष = नर, मर्द |
| अभिनय = हावभाव, अंगविक्षेप | पृथ्वी = धरती, धरणी,  भूमी |
| अभिनेता = नट | चाल=पद्धत, रीत, रिवाज |
| अभियान = मोहीम | प्रवीण = निपुण, कुशल, हुशार |
| अमित = असंख्य, अगणित, अपार | प्रसिद्ध = प्रख्यात, नामांकित |
| अरण्य = रान, वन | प्रासाद = वाडा, मंदीर |

| | |
|---|---|
| सर्प= साप, भुजंग | प्रेम = प्रीती, लोभ |
| आई = माता, जननी, माय, जन्मदा | फुल = पुष्प, सुमन, कुसुम, |
| घर = सदन, भवन, गृह | शक्ती= मित्र = सखा, दोस्त, सोबती, सवंगडी |
| गर्व = अहंकार,ताठा | युद्‌ध = लढाई, संगर, झुंज, संग्राम, समर, रण |
| गणपती = गजानन, लंबोदर | रस्ता = मार्ग, पथ, वाट, पंथ |
| गौरव = अभिनंदन, सन्मान | राग = संताप, क्रोध, त्वेष, रोष, कोप |
| जमीन = भु, भूमी, भुई, धरा | वेदना = यातना, कळ, दुःख |
| जरब = दरारा, दहशत, वचक, धाक | समुद्र = सागर |
| झाड = वृक्ष, तरु | सीमा = मर्यादा, हद्‌द |
| डोके = शीर, मस्तक, शीर्ष | स्त्री = महिला |
| डोळा = नयन, नेत्र | सुंदर = सुरेख, रम्य, रमणीय |
| डौल = दिमाख, ऐट, रुबाब | सुरुवात = आरंभ, प्रारंभ |

| | |
|---|---|
| तलवार = खडग, समशेर | सूर्य = रवी, आदित्य |
| दिवस = वार, दिन | सेनापती = सेनानी, सेनानायक |
| देऊळ = मंदिर, देवालय | हृदय = अंतःकरण |
| देव = ईश्वर, ईश | होडी = नाव, नौका |
| देह = शरीर | अपराध = गुन्हा |
| आकाश = गगन, अंबर, नभ, आभाळ | काठ =किनारा |
| आठवण = स्मरण, स्मृती | किल्ला = गड |
| आनंद =संतोष | किमया = जादू, चमत्कार |
| आवाहन = विनंती | खडक = दगड, पाषाण |
| आश्चर्य = नवल, विस्मय, अचंबा | गवई = गायक |
| आहार = भोजन, खाद्य | गाणे = गीत |
| ऋषी = मुनी, साधू | गाय = धेनु, गो, गोमाता |
| काळजी = चिंता, विवंचना | गोष्ट = कथा, कहाणी |

© BMM Marathi Shala eBook Team

| | |
|---|---|
| काळोख = अंधार, तिमिर, तम | गौरव = सत्कार |
| धन = संपत्ती, दौलत | गंध = वास |
| नमस्कार = वंदन, नमन, अभिवादन | |

## विरुद्धार्थी शब्द

| | |
|---|---|
| थंड x गरम | चांगले वाईट |
| ऊन x पाऊस | कुशल अकुशल |
| उंच x बुटका | दृश्य x अदृश्य |
| ताजे x शिळे | नियमित x अनियमित |
| सैल x घट्ट | निश्चित x अनिश्चित |
| सूरवात x शेवट | नीती x अनीती |
| तरुण x वृद्ध | न्याय x अन्याय |
| आत x बाहेर | पारदर्शक x अपारदर्शक |
| आरंभ x शेवट | पवित्र x अपवित्र |

© BMM Marathi Shala eBook Team

| | |
|---|---|
| आदर x अनादर | पूर्ण x अपूर्ण |
| आवड x नावड | पूर्णांक x अपूर्णांक |
| आनंद x दुःख | प्रत्यक्ष x अप्रत्यक्ष |
| होकार x नकार | प्रकट x अप्रकट |
| इकडे x तिकडे | प्रामाणिक x अप्रामाणिक |
| अंधार x उजेड | प्रिय x अप्रिय |
| गरीब x श्रीमंत | यशस्वी x अयशस्वी |
| ग्रामीण x शहरी | मर्यादित x अमर्यादित |
| मालक x नोकर | विश्वास x अविश्वास |
| नरम x मऊ | शक्य x अशक्य |
| भरती x ओहोटी | व्यवस्थित x अव्यवस्थित |
| मागचा x पुढचा | सत्य x असत्य |
| सरळ x वक्र | खरे x खोटे |

© BMM Marathi Shala eBook Team

| | |
|---|---|
| हसणे x रडणे | हजर x गैरहजर |
| सुपीक x नापीक | शिस्त x बेशिस्त , गैरशिस्त |
| सुरक्षित x असुरक्षित | सूर x बेसूर |
| स्पष्ट x अस्पष्ट | विजय x पराजय |
| आदर x अनादर | सुविचार x कुविचार |
| आवश्यक x अनावश्यक | सुशिक्षित x अशिक्षित |
| आरोग्य x अनारोग्य | अपमान x सन्मान |
| आवडता x नावडता | सशक्त x अशक्त |
| पास x नापास | ईमानी x बेईमानी |
| चांगले x वाईट | चूक x बरोबर , बिनचूक |
| कुशल x अकुशल | गुण x अवगुण |

© BMM Marathi Shala eBook Team

## स्तर पाचवा (Level 5 Pachawi)

- श्लोक
- कविता
- गोष्टी आणि उतारे
- शब्दसमूह
- म्हणी आणि वाक्प्रचार



श्लोक

© BMM Marathi Shala eBook Team

सर्वे भवंतु सुखिनः

सर्वे सन्तु निरामय:

सर्वे भद्राणि पश्चन्तु

मा कश्चिद् दुःख भाग्भवेत्

—------------------------------------------------------------------------------------------

एकश्लोकी रामायण

आदौ रामतपोवनादिगमनं हत्वा मृगं कांचनम्

वैदेही हरणं जटायु मरणंन सुग्रीव संभाषणम्   ।।१।।

वाली निर्दलनं समुद्र तरणं लंकापुरी दाहनम्

पश्याद्रावण् कुंम्भकर्ण हननं एतध्दि रामाय़णम्  ।।२।।

आकाशात पतितं तोयं

यथा गच्छति सागरम्

सर्व देव नमस्कारः

केशवं प्रतिगच्छति

© BMM Marathi Shala eBook Team

## कविता



### सायंकाळची शोभा

पिवळे तांबूस ऊन कोवळे पसरे चौफेर

ओढा नेई सोने वाटे वाहुनिया दूर

झाडांनी किती मुकुट घातले डोकीस सोनेरी

कुरणावर शेतात पसरला गुलाल चौफेरी

हिरवे हिरवेगार शेत हे सुंदर साळीचे

झोके घेते कसे चहूकडे हिरवे गालिचे

© BMM Marathi Shala eBook Team

सोनेरी मखमली रुपेरी पंख कितीकांचे

रंग किती वर तऱ्हेतऱ्हेचे इंद्रधनुष्याचे

अशी अचल फुलपाखरे फुले साळीस जणू फुलती

साळीवर झोपली जणू का पाळण्यात झुलती

झुळकन सुळकन इकडून तिकडे किती दुसरी उडती

हिरेमाणके पाचू फुटूनी पंखची गरगरती

पहा पाखरे चरोनी होती झाडावर गोळा

कुठे बुडाला पलिकडे तो सोन्याचा गोळा

- भा. रा. तांबे

## पसायदान



आता विश्वात्मके देवे, येणे वाग्यज्ञे तोषावे

तोषोनि मज द्यावे , पसायदान हे

जे खळांची व्यंकटी सांडो, तया सत्कर्मी रती वाढो

भूतां परस्परे पडो , मैत्र जीवांचे

दुरितांचे तिमिर जावो , विश्व स्वधर्म सूर्ये पाहो

जो जे वांच्छिल तो ते लाहो, प्राणिजात

वर्षत सकळ मंगळी , ईश्वर निष्ठांची मांदियाळी

अनवरत भूमंडळी भेटतु भूता

चला कल्पतरूंचे आरव, चेतनाचिंतामणींचे गाव

बोलते जे अर्णव पीयुषांचे

© BMM Marathi Shala eBook Team

चंद्रमे जे अलांछन, मार्तंड जे तापहीन

ते सर्वही सदा सज्जन , सोयरे होतु

किंबहुना सर्व  सुखी , पूर्ण होऊनी तिन्ही लोकी

भजिजो आदिपुरुषी अखंडित

आणि ग्रंथोपजीविये , विशेषी लोकी इये

दृष्टादृष्ट विजये होआवें जी

येथ म्हणे श्रीविश्वेश्वराओ , हा होईल दान पसाओ

येणे वरे ज्ञानदेवो सुखिया जाला

- संत ज्ञानदेव

© BMM Marathi Shala eBook Team

# घर



घर असावे घरासारखे

नकोत नुसत्या भिंती

इथे असावा प्रेम -जिव्हाळा

नकोत नुसती नाती

त्या शब्दांना अर्थ असावा

नकोत नुसती गाणी

सूर जुळावे परस्परांचे

नकोत नुसती गाणी

(विमल लिमये यांच्या “घर” कवितेतली २ कडवी  घेतली आहेत.  )

© BMM Marathi Shala eBook Team

## वीज

वीज हा दररोजच्या जीवनातील, अतिशय उपयोगी असा एक ऊर्जेचा प्रकार आहे. आकाशात वीज चमकणे, किंवा जमिनीवर पडणे, म्हणजे निसर्गातील अद्‌भूत चमत्कार आहे. प्रकाश आणि उष्णता निर्माण करणारी पुष्कळ यंत्रे विजेवर चालतात. फोन, टीव्ही, रेडिओ, चित्रपट, रडार, संगणक , रोबोट, अवकाशयाने , कृत्रिम उपग्रह, विमाने, जहाजे,   रेल्वे, मोटारगाड्या, इ.ठिकाणी विजेचा वापर होतो. मात्र विजेचा उपयोग काळजीपूर्वक केला नाही ;तर आग लागणे, विजेचा झटका लागून अपघात होणे व मृत्यू ओढवणे यासारख्या दुर्घटना घडू शकतात.

आजच्या आधुनिक युगात विजेची गरज दिवसेंदिवस वाढत चाललेली आहे. वीज निर्माण करण्यासाठी दगडी कोळसा, खनिज तेल अथवा नैसर्गिक वायू ही इंधने वापरली जातात पण त्यामुळे प्रदूषण वाढते. नैसर्गिक पद्‌धतीने वीज निर्मिती करता येते. सूर्यप्रकाश, पाणी, वारा, समुद्राच्या लाटा वापरून वीज बनवता येते पण मोठ्या प्रमाणात पैसा व तंत्रज्ञान लागते. यामुळे वीज वाचवणे शक्य आहे.

सौर ऊर्जेचा वापर दररोज आपल्या घरात व कार्यालयामध्ये केल्यास वीज वाचवता येते. आवश्यकता नसल्यास फॅन, लाईट बंद करून तसेच ए.सी. चा वापरही इकॉनॉमिक मोडमध्ये केल्यास वीज वाचवता येते. तसेच नवीन तंत्रज्ञानानुसार ट्यूबलाईटच्या ऐवजी एल.ई.डी लाईटचा वापर करून वीज वाचवता येते.

प्रश्न:

१) विजेचा वापर कुठे होतो?

२) विजेचा काळजीपूर्वक वापर न केल्याने कोणता धोका निर्माण होऊ शकतो?

३) वीज निर्माण करण्यासाठी काय वापरतात?

४) वीज वाचवणे का आवश्यक आहे?

५) वीज वाचवण्यासाठी कोणते उपाय करता येतात?

## गोष्टी आणि उतारे

### डॉ. आनंदीबाई जोशी

डॉ. आनंदीबाई जोशी ही भारतातील पहिली स्त्री डॉक्टर.  तिचा जन्म १८६५ मध्ये झाला. पुढे गोपाळराव जोशी यांच्याशी तिचा विवाह झाला. नीट औषध उपचार न मिळाल्याने आनंदीचे बाळ दहा दिवसाचे असतांना गेले. ह्या घटनेमुळे तिला अतिशय दु:ख झाले. तिने स्वतः डॉक्टर व्हायचा निश्चय केला. यासाठी आनंदी व गोपाळरावांना अनेक अडथळ्यांना तोंड द्यावे लागले. त्या काळात भारतात स्त्रियांना शिक्षण देण्याची पद्धत नव्हती. तरी देखील आनंदी वयाच्या सतराव्या वर्षी एकटी अमेरिकेला गेली. आनंदीने पेन्सिलव्हानियातील संत्र्यांच्या मेडिकल कॉलेजमध्ये डॉक्टरीचे शिक्षण घेण्यास सुरवात केली. अमेरिकेत असतांना आनंदी तिचा भारतीय वेष (म्हणजे नऊवारी पातळ )अभिमानाने वापरात असे. जवळ पैसे कमी असल्याने तिचे खूप हाल झाले. ती आजारी पडली. तिथल्या रोशेल या गावी राहणाऱ्या कार्पेन्टर नावाच्या बाईंनी खूप मदत केली. आनंदीला आपली मुलगी मानून तिची खूप काळजी घेतली.

कठीण परिस्थितीत असूनसुद्धा तिने खूप अभ्यास केला आणि ती डॉक्टरची परीक्षा उत्तम रीतीने पस झाली. आनंदीचे विक्टोरिया राणीकडून अभिनंदन झाले. पदवीदान समारंभासाठी गोपाळराव जोशी सुद्धा उपस्थिती होते. भारतात परतून महिलांसाठी डॉक्टरीचे महाविद्यालय सुरु करावे असे आनंदीबाईंचे स्वप्न होते.

भारतात परत आल्यावर तिची तब्येत खूपच बिघडली. अखेरीस वयाच्या बाविसाव्या वर्षी तिला मृत्यु आला. जिद्द आणि चिकाटी असेल तर कोणतेही काम अशक्य नाही हे आनंदीने सिद्ध करून दाखविले.

प्रश्न :

१. आनंदीबाईं जोशींचे वैशिष्ट्य काय आहे?

२. आनंदीबाईंचे अमेरिकेतले आयुष्य कसे होते?

३. आनंदीचे कार्पेन्टरबाईंशी कोणते नाते होते?

४. डॉ. आनंदीबाई जोषींनी भारतात परत आल्यावर काय करायचे ठरवले होते? का?

५. डॉ. आनंदीबाई जोशी यांच्या जीवनावरून आपल्याला काय शिकता येईल?

© BMM Marathi Shala eBook Team

## धन्य ती माता आणि धन्य तिचा पुत्र!

छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म इ.स.वि सन १६३० मध्ये शिवनेरी दुर्ग, जुन्नर, पुणे येथे झाला. त्यांच्या आऊसाहेबांचे नाव जिजाबाई भोसले व आबासाहेबांचे नाव शहाजीराजे भोसले होते. जिजाबाईंनी लहानपणापासूनच छोट्या शिवाजीवर चांगले संस्कार केले. रामायण व महाभारतातील गोष्टी सांगून जिजाबाईंनी शिवबाला राजनीती व धर्माची शिकवण दिली. शक्ती पेक्षा युक्ती श्रेष्ठ हे सूत्र जिजाबाईंनी शिवबाला शिकवले. तसेच स्त्रियांचा नेहमी आदर करण्यास शिकवले. शिवाय शस्त्रे चालविण्याचेही धडे दिले. लहानग्या शिवबाच्या मनात त्यांनी स्वराज्याचे बीज पेरले. जिजाऊंच्या पाठिंब्याने शिवबाने त्याच्या सवंगड्यांसह रायरेश्वराच्या मंदिरात हिंदवी स्वराज्याची शपथ घेतली. जिजाऊंच्या सल्ल्याने आणि सहकाऱ्यांच्या साहाय्याने अनेक अडचणींवर मात करून शिवरायांनी पुढील २५-३० वर्षात हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. ६ जून १६७४ रोजी शिवाजी महाराज हिंदवी स्वराज्याचे पहिले छत्रपती झाले. धन्य ती माता आणि धन्य तिचा पुत्र! जय जिजाऊ! जय शिवराय!

प्रश्न :

शिवाजी महाराजांचा जन्म कुठे झाला?

त्यांच्या आईचे व वडिलांचे नाव सांगा.

जिजाबाईंनी शिवबाला कोणत्या गोष्टी सांगितल्या?

जिजाबाईंनी शिवबाला काय काय शिकवले?

शिवबाने हिंदवी स्वराज्याची शपथ कुठे घेतली?

शिवाजी महाराज हिंदवी स्वराज्याचे पहिले छत्रपती कधी झाले?

© BMM Marathi Shala eBook Team

## समूहदर्शक शब्द : ( Collective noun)

**समूहदर्शक शब्द - एकापेक्षा जास्त वस्तू किंवा घटक यांना दर्शविण्यासाठी ज्या शब्दांचा वापर केला जातो त्यांना समूहवाचक शब्द असे म्हणतात. समूह म्हणजे group.**

| | |
|---|---|
| ज्याला जिंकता येत नाही असा | अजिंक्य |
| खंड नाही असे | अखंड |
| कलेची आवड असलेला | कलाप्रेमी |
| केलेल्या उपकारांची जाणीव ठेवणारा | कृतज्ञ |
| जे विसरता येणार नाही असे | अविस्मरणीय |
| अपेक्षा नसतांना घडलेली गोष्ट | अनपेक्षित |
| ज्याचे वर्णन करता येणार नाही असा | अवर्णनीय |
| अंग राखून काम करणारा | अंगचोर |
| जाणून घेण्याची इच्छा असलेला | जिज्ञासू |
| खूप आयुष्य असलेला | दीर्घायुषी |
| वाईट आचरण करणारा | दुराचारी |
| देशाची सेवा करणारा | देशभक्त |
| खूप दानधर्म करणारा | दानशूर |
| पायात जोडे न घातलेले | अनवाणी |

© BMM Marathi Shala eBook Team

| | |
|---|---|
| ज्याचा तहान लागत नाही असा | अथांग |
| थोडक्यात समाधान मानणारा | अल्पसंतुष्ट |
| संख्या मोजता न येणार | असंख्य |
| मिळूनमिसळून वागणारा | मनमिळावू |
| आईवडील नसणारा | अनाथ |
| जे होणे अशक्य आहे | असंभव |
| दुसऱ्यावर उपकार करणारा | परोपकारी |
| लोकांची वस्ती नसलेला भाग | निर्जन |
| पसंत नसलेला | नापसंत |
| श्रम करून जगणारा | श्रमजीवी |

© BMM Marathi Shala eBook Team

## म्हणी आणि वाक्प्रचार

म्हणी:

म्हण म्हणजे अनुभवाचे बोल सांगणारे वाक्य. म्हण हा शब्द 'म्हणणे'या वरून आलेला आहे. सर्वसामान्य लोकांनी जीवनातील अनुभवांवरून म्हटलेली काही बोधपर वाक्ये, कालांतराने हळूहळू भाषेत रूढ झाली. रोजच्या जीवनातील व्यवहाराविषयी सांगताना, निसर्ग, प्राणी, पक्षी, फळे, वस्तू आणि मनुष्य यांचे गुण / अवगुण आणि त्यातील साम्य किंवा विरोधाभास म्हणीतून दाखवला जातो. प्रत्यक्ष शब्दार्थापेक्षा त्यात दडलेला अर्थ समजून घेणे आवश्यक आहे.

उदा. **उंदराला मांजर साक्ष** - आपल्या संकटसमयी शत्रूचे सहाय्य घेणे हे परिणामी नाशाचे कारण ठरू शकते. ( उंदीर आणि मांजर हे एकमेकांचे शत्रू असल्याने उंदराने मांजराकडून मदतीची अपेक्षा ठेवू नये. )

अनेक पिढ्यांच्या अनुभवातून मिळालेले ज्ञान म्हणींमधून व्यक्त होते. म्हणी हा मराठी भाषा व संस्कृतीचा झगमगता दागिना आहे. म्हणी वापरून, एखाद्या प्रसंगाचे महत्व, घटनेवरून घेतलेला धडा, विषयातील बारकावा, गोष्टींचा आशय किंवा मनातील भावना योग्य रीतीने, चपखलपणे मांडता येतात. शब्दांचा फाफट पसारा न करता, मोजक्या शब्दात आपली मते किंवा विचार व्यक्त करता येतात. आपला मुद्दा स्पष्ट करण्यासाठी म्हणींचा उपयोग केला जातो. ह्या मुळे आपले बोलणेही परिणामकारक होते. संभाषणामध्ये म्हणींचा योग्य वेळी वापर करून आपले म्हणणे लोकांना पटवून देता येते. एरवीच्या गप्पा गोष्टींनासुद्धा वेगळीच रंगत येते. म्हणींमुळे भाषण आणि लेखनातील रंजकता वाढते. म्हणी भाषेची शोभा वाढवतात.

© BMM Marathi Shala eBook Team

म्हण आणि वाक्प्रचार यांतील फरक ओळखायचा कसा?

- **म्हण** पूर्ण वाक्य असते. उदा. चकाकते ते सोने नसते.
- **वाक्प्रचार** शब्दांचा समूह असतो. वाक्प्रचारातील शब्द समूहाच्या शेवटी बऱ्याचदा क्रियापद जोडले जाते. उदा. हातावर तुरी देणे
- वाक्प्रचारातील शब्द / शब्दसमूह यांचा शब्दार्थ घेऊन चालत नाही. रूढी किंवा परंपरेने यांना मूळ अर्थापेक्षा निराळा अर्थ प्राप्त झालेला असतो.
- वाक्प्रचार नेहमी तुलना करण्यासाठी वापरलेले जातात. यात कुठलाही बोध किंवा उपदेश नसतो. वाक्प्रचार म्हणजे कल्पित गोष्ट असते, म्हणीप्रमाणे यात प्राणी, पक्षी, व्यक्ती किंवा वस्तू यांचा संदर्भ वापरला जात नाही.

**म्हणी :**

| | म्हणी | अर्थ |
|---|---|---|
| १. | ऐकावे जनाचे पण करावे मनाचे | लोकांचे सल्ले जरूर ऐकावे पण शेवटी आपल्याला पटेल तोच निर्णय घेणे. |
| २. | इच्छा असेल तर मार्ग दिसेल | एखादी गोष्ट कराचे मनात असले म्हणजे काहीतरी मार्ग सुचतो. |
| ३. | नाचत येईना अंगण वाकडे | एखादे काम करता येत नाही म्हणून दुसऱ्याला दोष देणे. |
| ४. | थेंबे थेंबे तळे साचे | थोडे थोडे जमवत गेले की भरपूर जमते |
| ५. | पालथ्या घड्यावर पाणी | सर्व प्रयत्न निरुपयोगी ठरणे |

© BMM Marathi Shala eBook Team

| | | |
|---|---|---|
| ६. | कोल्ह्याला आंबट द्राक्ष | एखादी वस्तू आपल्याला मिळाली नाही की आपला कमीपणा लपवून त्या वस्तूलाच दोष देणे |
| ७. | दोन्ही घरचा पाहुणा उपाशी | सगळीकडून तोटाच होणे |
| ८. | बळी तो कान पिळी | त्यांच्याकडे ताकद तो आपल्या म्हणण्याप्रमाणे करावयास लावतो |
| ९. | इकडे आड तिकडे विहीर | दोन्ही बाजूंनी सारखीच अडचणीची स्थिती निर्माण होणे |
| १०. | पुढच्यास ठेच मागचा शहाणा | दुसऱ्याच्या अनुभवावरून मनुष्य काही बोध घेतो व सावधपणे वागतो |
| ११. | एका हाताने टाळी वाजत नाही | दोष दोन्हीकडे असतो |
| १२. | गाजराची पुंगी वाजली तर वाजली नाहीतर मोडून खाल्ली | एखाद्या गोष्टीची परीक्षा होण्यासाठी काही काळ वाट पाहावी लागते. |
| १३. | डोंगर पोखरून उंदीर काढणे | जास्त श्रम करून कमी फायदा होणे |
| १४. | उथळ पाण्याला खळखळाट फार | अंगी असणारा माणूस जास्त बढाया मारतो |
| १५. | कामापुरता मामा | काम साधण्यापुरतं गोड  बोलणे |
| १६. | पेरावे तसे उगवते | आपण जसे करतो तसेच त्यांचे फळ मिळते |

© BMM Marathi Shala eBook Team

| | | |
|---|---|---|
| १७. | शहाण्याला शब्दांचा मार | शहाण्याला प्रत्यक्ष माराची गरज नाही, नुसतं बोललं तरी पुरते |
| १८. | एक ना धड भराभर चिंध्या | एक काम नीट करण्याऐवजी सतराशे साथ कामे करणे |
| १९. | आग सोमेश्वरी बंब रामेश्वरी | रोग एकीकडे उपाय भलतीकडे |
| २०. | दोघांचे भांडण तिसऱ्याच लाभ | भाषण करणाऱ्यांचा कधीही फायदा होत नाही, तर तिसऱ्याच कोणाचा तरी फायदा होतो |
| २१. | उंटावरून शेळ्या हाकणे | आळस, हलगर्जीपणा करणे |
| २२. | पुढचे पाठ मागचे सपाट | नवीन गोष्ट शिकल्यावर ती उत्तम येणे आणि जुने शिकलेलं विसरून जाणे |
| २३. | काखेत कळसा गावाला वळसा | वस्तू स्वतःपाशी असून शोधात राहणे |
| २४. | अंथरूण पाहून पाय पसरावे | ऐपत पाहून खर्च करावा |
| २५. | जशास तसे | जो जसा वागेल त्याला त्याच्याच भाषेत उत्तर देणे |

## विभक्ती

नामांच्या किंवा सर्वनामांच्या रूपात जो बदल केला जातो त्याला विभक्ती असे म्हणतात.

उदा. नदीच्या डोहात रामाने उडी मारली. ( नदीच्या, डोहात, रामाने )

'च्या', 'त' आणि 'ने' ही विभक्तीची रूपे आहेत.

दिलेल्या शब्दाचे योग्य रूप वापरून गाळलेल्या जागा भरा.

उदा.(फूल) - फुलांची आवड असली की फूलं हवीहवीशी वाटतात.

शब्द - स्त्री

आज संक्रांतीला —-------------------- हळदीकुंकाचा समारंभ होता.

कार्यक्रमात —----------------------- द्यायला भेटवस्तू आणल्या होत्या.

सगळ्या —------------------------ काळया साड्या नेसल्या होत्या.

गप्पागोष्टी, तिळगुळ व खरेदी यांत सर्व —--------------- मग्न होत्या.

एकुण —------------------------ खूप मजा चालली होती.

शांत रहा ' ही सूचना कोणीच ऐकली नाही.

© BMM Marathi Shala eBook Team

# परिशिष्टे

शिष्टाचार आणि स्वागत

मराठी सुविचार

मुलांसाठी छान छान खेळ

अभ्यासाव्यतिरिक्त उपयुक्त संकल्पना

कार्यशाळा , शिबिरे, प्रकल्प, स्पर्धा इत्यादी

सकस आहार

© BMM Marathi Shala eBook Team

## शिष्टाचार आणि स्वागत

आपल्या वर्गाची सुरवात काही शिष्टाचार आणि स्वागतपर  शब्दांनी केल्यास मुलांनी त्याची पटकन सवय लागेल

सर्वांचे स्वागत !

नमस्ते

नमस्कार

शुभ सकाळ अथवा शुभ दुपार ( आपल्या वर्गाच्या वेळेनुसार बदल करता येईल )

शुभ रात्री

पुन्हा भेटूया !

आभार

धन्यवाद

माफ करा

© BMM Marathi Shala eBook Team

## मराठी सुविचार

- देणाऱ्याने देत जावे घेणाऱ्याने घेत जावे
  घेता घेता एक दिवस देणाऱ्याचे हात घ्यावे
- लवकर निजे लवकर उठे
  त्याला ज्ञान संपत्ती आरोग्य लाभे
- आळस हा माणसाचा मोठा शत्रू आहे
- हसा खेळा पण शिस्त पाळा
- विद्या विनयेन शोभते
- उद्याचे काम आज करा , आजचे काम आता करा
- शक्तीपेक्षा युक्ती श्रेष्ठ
- एका वेळेला एकच काम एकाग्रतेने करा
- एकमेका सहाय्य करू अवघे धरू सुपंथ
- कठोर परिश्रमास पर्याय नाही
- सुविचार ही माणसाच्या आयुष्यातली मोठी शक्ती आहे
- अंथरून पाहून पाय पसरावे
- गर्जेल तो पडेल काय?
- प्रयत्नांती परमेश्वर
- पेराल तेच उगवते
- संकटकाळी उपयोगी पडतो तोच खरा मित्र
- समाधान ही सुखाची गुरुकिल्ली आहे
- निंदकाचे घर असावे शेजारी

© BMM Marathi Shala eBook Team

## मुलांसाठी छान छान खेळ

काही वेळा वर्ग चालू असताना मुले कंटाळतात .
काही वेळा थोड्या वेगळेपणाची ,बदलाची आवश्यकता असते. अशा वेळेला आपण अनेक खेळ वर्गात घेऊ शकतो.
त्यासाठी आपली कल्पना शक्ती आणि थोड्या नियोजनाची आवश्यकता असते.
काही कल्पना सुचवीत आहोत ,पण त्यात वर्गातील मुलांची संख्या आणि वय याप्रमाणे जरूर बदल करावेत.
हे खेळ कसे असावेत?
मुलांना गंमत वाटतील असे
त्यांची स्मरणशक्ती वाढवतील असे
मित्रत्वाची भावना वाढविणारे आणि स्पर्धा भावना न वाढविणारे असावेत.

### १ ) स्मरण खेळ १

मुलांना माहित असलेल्या २० - २५ वस्तू जमवायच्या . उदाहरणार्थ : पेन, पेन्सिल, खडू ,बांगड्या, आरसा , पावडर डब्बा , फुल , पाने कागद, पिन, कात्री ,बटण सुई , दोरा, विणकाम लोकर , पोस्टकार्ड , किल्ली, कुलूप , रिबन, पाण्याची बाटली छत्री , लिहिण्याचे पॅड इत्यादी. मुलांना त्या वस्तू २ मिनिटे दाखवून नंतर त्यावर कापड टाका. त्या वस्तूंची नावे त्यांना कागदावर लिहायला सांगा

### स्मरण खेळ २

स्मरण की-खेळातील १०-१५ वस्तू घ्या . आधी दाखविलेल्या वस्तूतून काही वगळा कुठल्या वस्तू वगळल्या आहेत त्याची यादी मुलांना करायला सांगा

त्यानंतर त्या वस्तूंची वर्गवारी करायला सांगा

उदा. प्रसाधनं

वर्गातील वस्तू

शिवणकाम विणकाम वस्तू

इत्यादी

**स्मरण खेळ ३**

स्मरण खेळातील काही वस्तू बाजूला काढा , त्या मुलांना डोळे झाकून ओळखायला सांगा

(ह्या खेळाचे अनेक प्रकार घेता येतील. उदा. रंग , चवी, फळे शिकवताना त्या वस्तू वर्गात

आणून दाखवता येतील )

**स्मरण खेळ ४**

पहिल्या वेळी ५ जणांचा ग्रूप .. पहिल्यानी नांव सांगायचे, दुसऱ्याने पहिल्याचे नांव आणि मग स्वतः चे नांव सांगायचे, तिसऱ्याने पहिली दोन नांव सांगायची मग स्वतःचे नांव सांगायचे. असे करत जायचे ५ नांवे झाली कि दुसऱ्या दिवशी मोठा ग्रूप करायचा..

ज्यांना नांवं सांगता येणार नाहीत ते आऊट.

फायदा.... वर्गातल्या सगळ्यांची नांवे कळतात, ओळख होते, स्मरणशक्ती वाढते.

© BMM Marathi Shala eBook Team

## २) एका शब्दापासून अनेक शब्द तयार करणे

फळ्यावर कमलिनी पाटणकर , वालचंदनगर अशासारखी मोठी नावे द्यावी . एकवेळेला एकाच नाव द्यावे मुलांना खडू देऊन त्या शब्दापासून तयार होणारे जास्तीत जास्त शब्द लिहायला सांगावेत.

उदा वालचंदनगर

वाल
चंदन
नगर
गर
नग
रवा
गवा

### ३) हसत खेळात अंक शिकवा

वर्गातील प्रत्येकाला आपला वाढदिवस फळ्यावर लिहायला सांगा.
एका वेळेला एका मुलाला लिहायला संधी द्या.
११-३१ अंक
इंग्लिश महिने
आणि वर्ष ( उदा १९६९ , २०१२ , २००८ ) असे लिहिण्याचा सर्व होईल आणि खेळ होईल

© BMM Marathi Shala eBook Team

## ४) चित्रमालिकेवरून गोष्टी सांगणे

चित्रमालिकाची पाने इंटरनेटवरून प्रिंट करून घेणे
मुलांना ती दाखवून त्याची क्रमवारी लावा.
त्या नंतर प्रत्येक चित्राचे एकेका मुलाला वर्णन करायला सांगा

## ५) एखादा विनोद मराठीत वर्गात सांगणे

### मुलांसाठी मराठी विनोद

चिंटू : "आजी मी पाळण्याच्या शर्यतीत भाग घ्यायला चाललो आहे . आशीर्वाद दे "
आजी: " चिंटू आशीर्वाद आहे सावकाश पळ  रे बाबा !"

आई : "साहिल का रडतोस?"
साहिल: "दादा पाय घसरून पडला चिखलात"
आई:" अरे मग तुला तर हसू यायला पाहिजे "
साहिल: " मी अगोदर हसलोच होतो "

शास्त्रद्यांनी हे सिद्ध केलाय की जगात १५७२३४५५४९३ इतके लोक आळशी आहेत , त्यांनी आतासुद्धा वर दिलेली संख्या वाचली नसणार.

गुरुजी : "काय रे चिराग? वर्गात  डुलक्या देतो आहेस?"
चिराग: "नाही गुरुजी , गुरुत्वाकर्षणाने डोकं खाली पडतंय"

गुरुजी : “पिंटू, सांग बघू सुई टोचल्यावर रक्त का बाहेत येते?”
पिंटू: “कोणी सुई टोचली ते बघायला”

गुरुजी : मोनिका सांग  बघू , रावणाला  कोणी मारले?
मोनिका:  मी नाही गुरुजी , मी झोपले होते.

सागर : बाबा मला तबला आणून द्या ना , मला वाजवायचायं.
बाबा:  नको, तू सगळ्यांना त्रास देशील.
सागर:  नाही बाबा,  मी सगळे झोपल्यावर वाजवीन.

सुमित काळ वाढदिवसाच्या पार्टीला पुसून निघणारे टॅटु काढत होते
निशा:  बघू तुझा टॅटु ?
सुमित:  बघ गिटार आहे.
निशा:  मग खाजवल्यावर वाजत असेल !

© BMM Marathi Shala eBook Team

## कोडे

भारतातील प्रांतातील वैशिष्ट्ये :

वेगवगेळ्या चिठ्ठ्या करायच्या..
म्हणजे महाराष्ट्र… शिवाजी, नऊवारी साडी, नथ,गुढीपाडवा, गणपती उत्सव,श्रीखंड पुरी,
पुरणपोळी, दिवाळीचे किल्ले, गोदावरी, सह्याद्री वगैरे ..

तसेच इतर प्रांतातील चिठ्ठ्या एकत्र करून एकेक उचलायची. मगओरडून महाराष्ट्र म्हटलं
की ज्यांच्याकडे त्या चिठ्ठ्या आहेत त्यांनी एकत्र जमायचं. त्यांचा एक गट. किती मुले त्यावर
प्रांत व चिठ्ठ्या करायच्या.  मग त्या गटांनी काही खेळ खेळायचे,  उदा. रिले .

यावरून भारताची जास्त माहिती होते.

**९ ) प्रेक्षणिय स्थळे ओळखणे. ठिकाण व जोड्या लावणे.**

**१०) जाहिराती जोड्या लावणे..**
चित्र.आणि टॅग लाईन किंवा चित्र आणि वस्तूचे नांव

© BMM Marathi Shala eBook Team

**मराठी शाळा अभ्यासक्रम व्यतिरिक्त संकल्पना ( कार्यशाळा, शिबिरे, प्रकल्प, स्पर्धा इत्यादी )**

**नवरात्र भोंडला आणि खिरापत**

**दसरा निमित्ताने :**

आपट्याच्या झाडाचे महत्व , आपट्याचे सोनेरी पान  तयार करणे - आर्ट प्रोजेक्ट

**दिवाळी :**

किल्ला स्पर्धा

किल्ला तयार करताना  मुलांना होणारे लाभ -

१. महाराष्ट्र इतिहास, शिवाजी राजे चरित्र ओळख

२. सांघिक कार्य  - teamwork, टीम बिल्डिंग,

३. अभियांत्रिकी ज्ञान - बळकट उंच रचना करणे, मातीविटांचा वापर

दिवाळी कंदील तयार करणे, रांगोळी , मातीचे दिवे तयार  करणे

**संक्रांत सण  निमित्ताने :**

पतंग तयार करणे कार्यशाळा

**गुढीपाडवा निमित्ताने :**

तोरण तयार करणे, गुढी बनविणे

**गणपती पूजा निमित्ताने :**

मखर, आरास बनविणे, चिकणमातीच्या गणपती तयार करणे , अथर्वशीर्ष पाठांतर

© BMM Marathi Shala eBook Team

**स्थानिक मंडळाच्या वार्षिक उत्सवात :**
नाटुकली बसविणे, कथा कथन , श्लोक पाठांतर , सामूहिक गीत सादरीकरण

## अभ्यासाव्यतिरिक्त उपयुक्त संकल्पना.

क्रिकेट, खो- खो , हुतूतू , लगोरी, विटी- दांडू असे खेळ शिकविणे.

**ख्रिसमस आणि उन्हाळयाच्या सुट्टीमध्ये करता येतील असे उपक्रम:**
निबंध स्पर्धा, पत्रलेखन स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, उभ्या -उभ्या विनोद सांगणे
सूर्यनमस्कार, योगासने.
मराठी सिनेमा आयोजित करणे: संत ज्ञानेश्वर , संत तुकाराम, शिवाजी महाराज, इत्यादी.
अगदी सोप्या मराठी पाककृती तयार करणे, अथवा मराठी जेवणातील पदार्थांची, पक्वान्न
ओळख

**जागतिक पर्यावरण दिवसाच्या निमित्ताने :**

सुविचार : झाडे लावा , झाडे जगवा.
प्रत्येक विद्यार्थ्याला एका झाडाची माहिती मराठीमध्ये लिहून आणायला सांगणे.
"शो अँड टेल "- संकल्पनेवर आधारित , वर्गात आवडीचे एक झाड ( तुळस, मोगरा, अबोली घरात असल्यास आणायला सांगणे).
**मुलांसाठी कॅम्पचे आयोजन**

# सकस आहार

अन्न ही मानवी जीवनाचे अस्तित्त्व टिकवण्यास आवश्यक अशी प्राथमिक गरज आहे. आपल्या शरीराची वाढ होणे, झीज भरून काढणे, ऊर्जा निर्मिती हे सगळे आपल्याला अन्नातून मिळणाऱ्या घटक पोषण तत्त्वातून मिळते. त्यामुळेच आपण घेत असलेल्या आहारात पोषक अन्नाचा समतोल असणे आवश्यक आहे.

रोजच्या आहारात

दुग्धजन्य पदार्थ - मुलांना चित्र दाखवा

फळे व भाजीपाला- मुलांना चित्र दाखवा

स्निग्ध पदार्थ - मुलांना चित्र दाखवा

तृणधान्य व कडधान्य - मुलांना चित्र दाखवा

सकस आहार म्हणजे काय किंवा रोजच्या आहारात काय बदल केले म्हणजे आपण समतोल आहाराचं सेवन करू शकतो हे जाणून घेऊया. .

आहार संतुलित असण्यासाठी आहारात प्रोटीन जीवनसत्त्व, खनिजद्रव्य, फॅट्स, कॅल्शियम, फायबर अशा घटकांचा समावेश करावा .अशा आहाराने शहरातील अवयव आणि अणू रेणू सुदृढ होतात व त्यांची वाढ होते.

थोडेसे **वजन वाढले** की आहार कमी करण्याची प्रवृत्ती लोकांमध्ये अधिक आहे परंतु तसे करण्यापेक्षा आहार समतोल चौरस असावा याकडे लक्ष दिले पाहिजे. जेवणात भाजी, आमटी, ताक, ज्वारी किंवा बाजरीची भाकरी, कोशिंबीर यांचा समावेश असावा. हे अन्न कमी तेलात तयार केलेले असावे याशिवाय आणखी काय टाळावे व काय खावे हे पाहूयात.

कोणत्या वेळेला कोणत्या अन्न पदार्थाचे सेवन करावे हे पाहूया.

© BMM Marathi Shala eBook Team

**१. सकाळी न्याहारी.**

गरज :- कॅल्शियम, प्रोटीन व लोह.

पोषणासाठी आवश्यक पदार्थ :- एक ग्लास  दूध दही ताक  पनीर यापैकी कोणताही एक पदार्थ .

ऊर्जेसाठी पूरक :- शिरा, पोहे, पोळी, टोस्ट, ब्रेड, अंडे व फळे.

**२. दुपारचे जेवण**

गरज :- प्रोटीन, व्हिटॅमिन्स, मिनरल्स व लोह.

पोषणासाठी आवश्यक पदार्थ :- एक मध्यम आकाराची वाटी घट्ट डाळ, उसळ व मांसाहारी मध्ये मासळी किंवा चिकन/ अंड्याचा पदार्थ.

ऊर्जेसाठी पूरक :- चपाती, भात, भाकरी, ताक, दही व कोशिंबीर इ.

**३. संध्याकाळची न्याहारी**

गरज:- कॅल्शियम, प्रोटीन.

पोषणासाठी आवश्यक व ऊर्जेसाठी पूरक पदार्थ:- चणे दाणे पनीर लिंबू सरबत.

**४. रात्रीचे जेवण**

पोषणासाठी आवश्यक पदार्थ :- भाकरी, पोळी, भात, फळभाजी, कोबी, गाजर, दुधी भोपळा व बटाटा.

ऊर्जेसाठी पूरक:- कढी, सुप व कोशिंबीर .

© BMM Marathi Shala eBook Team

आजच्या फास्ट  लाइफमध्ये आपल्या कडून फास्ट फूड व जाहिरातबाजीमुळे नको ते अन्न सेवन केले जात आहे .आरोग्यावर परिणाम करणाऱ्या बहुतेक घटकांवर आपले नियंत्रण नसते त्यामुळे आपल्या शरीराची काळजी घेण्यासाठी उत्तम संतुलित व सकस आहार, पुरेशी झोप आणि जोडीला व्यायाम करणे अत्यंत गरजेचे आहे .

जरी विभिन्न आपले अन्न, विभिन्न आपले वेश भाषा,

परी शारीरिक तंदुरुस्तीसाठी संतुलित आहार गरजेचा




**आहार**

**तुम्हाला हे माहित आहे? एकदा वाचा:**

ताजे व गरम अन्न सेवन करावे. पालेभाज्या व फळे यांचा आहारात समावेश करावा. भाज्या व फळे स्वच्छ धुऊन घ्यावीत. त्यामुळे जंतू पोटात जात नाहीत. दिवसभरात भरपूर पाणी प्यावे.

© BMM Marathi Shala eBook Team

तुम्ही दिवसभरात कोणता आहार घेता याची यादी करा.

| सकाळी<br>(न्याहारी)<br>Breakfast | दुपारी<br>(जेवण)<br>Lunch | सायंकाळी<br>(फराळ)<br>Snack | रात्री<br>(जेवण)<br>Dinner |
|---|---|---|---|
| | | | |

**संतुलित आहार**




**पाणी**



© BMM Marathi Shala eBook Team

# Study guide & SYLLABUS (Grade 1 through 5.)

© BMM Marathi Shala eBook Team

| भाषा कौशल्य | विषय | | उप विषय / माहिती | उदाहरण | संदर्भ / साधने |
|---|---|---|---|---|---|
